रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३०२
www.ramprahar.com

# राम प्रहर

मंगळवार, २० मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## ‘त्या’ शेतकऱ्याला केंद्रीय कृषिमंत्र्यांकडून दिलासा



**नवी दिल्ली** : सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओतील एका शेतकऱ्याची केंद्रीय कृषिमंत्र्यांना दखल घ्यावी लागली. व्हायरल झालेला एक व्हिडीओ, जो बघून प्रत्येकजण हळहळला. शेतातून बाजारात विक्रीसाठी आणलेला भुईमूग अवकाळी पावसाने वाहून जाऊ लागला. भरपावसात शेतकरी ते अडवण्याचे प्रयत्न करत होता. महाराष्ट्रातील या शेतकऱ्याला केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कॉल करून धीर दिला आणि मदतीची ग्वाही दिली. मी तुमचा तो भुईमूग पाऊस पडल्यामुळे खराब झाल्याचा व्हिडीओ बघितला. मला वेदना झाल्या, पण तुम्ही काळजी करू नका. महाराष्ट्रातील सरकार संवेदनशील आहे. माझे आताच बोलणे झाले आहे. देवेंद्रजी असो किंवा महाराष्ट्राचे कृषीमंत्री दोघेही संवेदनशील आहेत, असे कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान हे गौरव पनवार यांना म्हणाले.

## अंतरंग

अलिबाग, महाडमध्ये तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद/२
माथेरान शटलसाठी ऑनलाईन आरक्षणाची मागणी/५
रायगडच्या तेजा, समीर यांची बीच कबड्डी संघात निवड/८

# प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडवण्यासाठी आता रस्त्यावरची लढाई लढणार!

## कोपरच्या पारंपरिक स्मशानभूमीवर तोडक कारवाई केल्यास जनआंदोलनाचा इशारा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आक्रमक पवित्रा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडकोने कोपर गावातील पारंपरिक स्मशानभूमीवर तोडक कारवाईची टांगती तलवार आणली आहे, मात्र ही केवळ कोपर ग्रामस्थांच्या स्मशानभूमीची समस्या राहिली नसून सिडकोकडून प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. सिडको वारंवार भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांवर अन्याय करीत आहे हे खपवून घेतले जाणार नाही. लोकनेते ‘दिबा’साहेबांनी कणखर भूमिका घेऊन प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवले. त्यामुळे आता प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडवण्यासाठी रस्त्यावरची लढाई लढावीच लागेल, असा आक्रमक पवित्रा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घेतला.

पनवेल तालुक्यातील कोपर (गव्हाण) येथील शेकडो वर्षांपूर्वीच्या पारंपरिक स्मशानभूमीवर सिडको तोडक कारवाई करणार असल्याचे समजताच या कारवाईला विरोध करण्यासाठी सोमवारी (दि. १९) सकाळी कोपरसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने एकवटले. त्या वेळी कारवाईला कडाडून विरोध करताना लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते.

या वेळी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी सिडकोसमवेत बैठक लावण्यासंदर्भात उलवे पोलीस ठाण्यावर पायी मोर्चा काढून निवेदनही देण्यात आले तसेच उरणचे आमदार महेश बालदी आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या असहकार्याच्या भूमिकेबद्दल ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. स्मशानभूमीबाबत ठोस उपाययोजना न केल्यास सिडको, पोलीस स्टेशन, तहसीलदार कार्यालय व वेळप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरही ठिय्या मांडू, असा इशाराही देण्यात आला. या वेळी सिडकोविरोधात घोषणा देत स्मशानभूमीच्या कारवाईला आणि स्थलांतरित जागेला तीव्र विरोध दर्शविण्यात आला.

पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, जितेंद्र म्हात्रे, भार्गव ठाकूर, सचिन घरत, रत्नप्रभा घरत, विजय घरत, किशोर पाटील, वामन म्हात्रे, मनोज घरत, साईचरण म्हात्रे, वैभव घरत यांच्यासह कोपर व पंचक्रोशीतील ग्रामस्थ व महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले की, कोपरची स्मशानभूमी सिडकोने २००६ साली बांधली. २०२० साली स्मशानभूमीभोवती कंपाउंड वॉल बांधण्यासाठी सिडकोने टेंडर काढले आणि आता सिडको स्मशानभूमीवर तोडक कारवाई करू पाहते. त्यामुळे सिडको वारंवार भूमिका बदलत असून प्रकल्पग्रस्तांबाबत दुटप्पी धोरण लादत आहे. येथील वसाहतींना स्मशानभूमीचा त्रास होत असल्याचे सांगत सिडको स्मशानभूमीवर कारवाई करणार असल्याचे म्हणते, मात्र या ठिकाणी वसाहती नंतर उभ्या राहिल्या असून स्थानिक भूमिपुत्र-प्रकल्पग्रस्तांची स्मशानभूमी परंपरागत अस्तित्वात आहे हे ध्यानात ठेवावे. येथून स्मशानभूमी हटवल्यास गोरगरीब, वयोवृद्ध नागरिकांना अंत्यविधीसाठी अनेक अडचणींचा सामोरे जावे लागेल याची सिडकोला बिलकुल जाण नाही.

सिडकोने ९५ गावांची जमीन संपादित केली, मात्र अद्यापही या सर्व गावांच्या स्मशानभूमींचा प्रश्न सोडवलेला नाही. त्यामुळे नवीन स्मशानभूमी बांधताना गावातील पारंपरिक जुन्या स्मशानभूमींवर कारवाई करून चालणार नाही. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदर्श सरकार कार्यरत आहे. त्यामुळे सिडकोने नागरिकांवर अन्याय करू नये. प्रकल्पग्रस्तांच्या या समस्येबाबत आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर या दोघांनीही जातीने लक्ष घालावे, अशी सूचनाही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केली.

प्रकल्पग्रस्तांवरील अन्यायाबाबत सिडकोविरोधात लढाई पुकारल्यास कल्याण, ठाणे, डोंबिवली, नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तदेखील सहभागी होतील. प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागेल. आपल्याला आपले हक्क भांडूनच मिळवावे लागतील. सुरुवातीला यासाठी पनवेल व उरण तालुक्यातील प्रकल्पग्रस्त व ग्रामस्थांची मजबूत संघटना गठीत करण्यात येईल. कोपरच्या स्मशानभूमीतून या जनआंदोलनाची ही केवळ ठिणगी पेटली आहे, मात्र प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवायचे असतील तर खऱ्या अर्थाने पेटून उठावे लागेल, असे आवाहनही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले. (पान २ वर..)



## उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रगतिपथावर आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी (दि. १९) रायगड जिल्ह्यातील महामार्गाच्या कामाची हवाई आणि प्रत्यक्ष पाहणी करून काम पूर्ण करताना येणाऱ्या अडचणींचा आढावा घेतला.

**काम पूर्ण करण्यासाठी राज्य शासन निधी देणार**

महामार्गावरील अपूर्ण पूल, बाह्यवळणे आणि सर्विस रोडची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले तसेच या महामार्गासंदर्भात मंत्रालयात वरिष्ठ पातळीवर बैठक घेऊन ज्या कामांसाठी राष्ट्रीय महामार्गातर्फे निधी उपलब्ध होऊ शकत नाही; त्यासाठी राज्य शासन निधी उपलब्ध करून देईल, असे आश्वासन दिले.

माणगाव येथील आनंद भुवन सभागृहात मुंबई-गोवा महामार्ग आढावा बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. व्यासपीठावर महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले उपस्थित होते.

या बैठकीत रायगड जिल्ह्यातील पनवेलपासून ते महाडपर्यंत मुंबई-गोवा महामार्गाचा आढावा घेण्यात आला. माणगाव व इंदापूर येथील वाहतूक कोंडी विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कामामध्ये होणाऱ्या दिरंगाईबद्दल नाराजी व्यक्त केली. नागरिकांना सेवा देण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. त्यामुळे जिथे केंद्राकडून निधी उपलब्ध होऊ शकणार नाही; त्यासाठी राज्य शासनाला परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा. अर्थसंकल्पत निधीची तरतूद करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले तसेच या कामांचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले. (पान २ वर..)

## निवडक

### बंगळुरूमध्ये तुफान पाऊस; जनजीवन विस्कळीत

**बंगळुरू** : कर्नाटकची राजधानी बंगळुरूमध्ये रविवारी रात्री मुसळधार पाऊस पडला. तब्बल ११० मिमीपेक्षा जास्त पावसाने आयटी सिटीतील रस्ते आणि घरे पाण्याखाली गेली तसेच अनेक भागात वाहने पाण्याखाली अडकली. लोकांना तुंबलेल्या पाण्यातून बाहेर काढावे लागले. शहरातील महादेवपुरा भागात भिंत कोसळल्याने एका ३५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे.

### उरणमधील करळ ब्रिजवर टँकर उलटून गॅस गळती

**उरण** : तालुक्यातील करळ-सोनारी ब्रिजवर एक गॅस टँकर अवघड वळणावर सोमवारी (दि. १९) दुपारी ३ ते ४च्या दरम्यान उलटला. या अपघातात कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नसली तरी गॅस गळती होऊन दूरवर हे लोट पसरले. खबरदारी म्हणून हा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. पोलीस तसेच अग्निशमन दलाने पाहणी केली.

## परेश ठाकूर यांच्या पुढाकारातून कुस्तीला वैभव मिळणार -ना. मुरलीधर मोहोळ

### पुरुषांमध्ये सिकंदर शेख, विजय चौधरी, शिवराज राक्षे, किरण भगत; तर महिलांत अमेघा घरत, सृष्टी भोसले किताबाचे मानकरी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी रायगड जिल्ह्यात कुस्तीसाठी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे आता रायगड जिल्हा आणि कोकणातही कुस्तीला वैभव मिळेल, असे प्रतिपादन केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी रविवारी (दि. १८) कामोठे येथे केले.

महाराष्ट्राच्या मातीतून जन्मलेली आणि राज्याच्या परंपरेशी नाळ जुळवणारी कुस्ती हा केवळ खेळ नसून शौर्य, परंपरा आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. याच परंपरेला पुन्हा उजाळा देत पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व युवकांचे प्रेरणास्थान परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे आणि रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनच्या वतीने परेशशेठ ठाकूर केसरी भव्य कुस्ती स्पर्धा कामोठे सेक्टर ६मधील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या भव्य मैदानात लाल मातीवर व दर्जेदार आयोजनात रंगली.

या स्पर्धेला प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांची उपस्थिती लाभली. त्या वेळी ते बोलत होते.

रायगड जिल्ह्यात कबड्डीपेक्षा कुस्ती कमी प्रमाणात खेळली जाते, पण या स्पर्धेच्या माध्यमातून कुस्तीचा प्रचार आणि प्रसार होत आहे. परेश ठाकूर हे जिल्ह्याचे नेतृत्व करीत असल्याने आता कुस्तीला चांगले दिवस येऊन या ठिकाणी खूप चांगले मल्ल घडतील, अशी आशा मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली. त्यांनी पुढे बोलताना कुस्तीरसिकांची मोठी उपस्थिती व आयोजनाबद्दल भरभरून कौतुक केले. फक्त पुढच्या वर्षी जेव्हा स्पर्धा घ्याल तेव्हा यापेक्षाही मोठे मैदान बघा, कारण आज ही जागा या उत्तम स्पर्धेसाठी कमी पडली आहे, अशा शब्दात त्यांनी स्पर्धेचे कौतुक केले.

ट्रिपल महाराष्ट्र विजय चौधरी, महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख, डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे असे महाराष्ट्रातील नामवंत कुस्तीपटू एकाच मैदानात बघायला कमी मिळतात, पण ते या स्पर्धेतून शक्य झाले आहे. त्यामुळे मी सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो. महाराष्ट्राच्या कुस्तीचा देशात नावलौकिक आहे. ऑलिम्पिकमधील पहिले पदक महाराष्ट्रातील खाशाबा जाधव यांनी कुस्तीत मिळवून दिले आणि देशाचे पहिले व्यक्तिगत स्वरूपात ते पदक होते. (पान २ वर..)



## जीवन गौरव पुरस्काराने लोकनेते रामशेठ ठाकूर सन्मानित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दैनिक महासागर आणि पनवेल प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १८) पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके सभागृहात महासागर एक्सलन्स अवॉर्ड २०२५चे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्यासाठी चित्रपट अभिनेत्री दिपाली सय्यद, दै. महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक, बेटी बचावचे प्रमुख डॉ. गणेश राख, शिवसेनेचे महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमन, दै. महासागर नाशिकचे संपादक प्रा. जयंत महाजन, जे जे ऑफ आर्ट नागपूरचे अधिष्ठाता विश्वनाथ साबळे, पनवेल प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे आदी उपस्थित होते. या वेळी महाराष्ट्रभरातून सर्व स्तरातील व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

अंत्यविधीसाठी जाताना काळाचा घाला

## खेडच्या जगबुडी नदीत कार कोसळून पाच जणांचा मृत्यू



**खेड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर खेड येथे जगबुडी नदीच्या पुलावरून कार कोसळून पाच जणांचा मृत्यू झाला. मुंबईहून देवरूख येथे अंत्यविधीसाठी जात असताना सोमवारी (दि. १९) पहाटे हा अपघात झाला. या घटनेत कारचालकासह दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

प्राथमिक माहितीनुसार मुंबईनजीकच्या मिरा रोड व नालासोपारा येथील कुटुंब देवरूख येथे अंत्यसंस्कारासाठी चालले होते. खेड भरणे नाका येथे जगबुडी नदीच्या पुलावरून भरधाव कार ही चालकाचे नियंत्रण सुटून थेट १०० फुट खाली कोसळली.

या अपघातात कारमधील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये मेधा परमेश पराडकर, सौरभ परमेश पराडकर (२२), मिताली विवेक मोरे (४५), निहार विवेक मोरे (१९), श्रेयस राजेंद्र सावंत (२३) यांचा समावेश आहे, तर विवेक श्रीराम मोरे व परमेश पराडकर हे गंभीररित्या जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## दारूमुक्त खारघरचा निर्धार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर शहर दारूमुक्त व्हावे यासाठी सहयोग सेवाभावी संस्था आणि नागरिकांच्या वतीने जनआंदोलन उभारण्यात आले आहे. या आंदोलन अंतर्गत रविवारी (दि. १८) सांकेतिक उपोषण करण्यात आले. या उपोषणाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन आंदोलकांशी संवाद साधला आणि दारूमुक्त खारघरसाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला.




राज्य शासनाने खारघर शहर दारूमुक्त घोषित करावे यासाठी संघर्ष समिती गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्नशील आहे. २००७पासून मोर्चे, आंदोलने आणि शासनाकडे पत्रव्यवहार समितीने केला आहे. याच मागणीसाठी १८ मे रोजी खारघरमधील शिल्प चौकात एकदिवसीय सांकेतिक उपोषण करण्यात आले, ज्याला खारघरवासीयांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या आंदोलनात सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, ॲड. नरेश ठाकूर तसेच किर्ती नवघरे, वासुदेव पाटील, समीर कदम, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, अमर उपाध्याय यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

# अलिबाग, महाडमध्ये तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद



**अलिबाग : प्रतिनिधी**

ऑपरेशन सिंदूरला पाठिंबा देण्यासाठी, तसेच भारतीय सैन्य दलाच्या शौर्य बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे तिरंगा रॅलीच आयोजन करण्यात आले होते. भाजप, शिवसेना पक्षातील नेते आणि नागरिक या रॅलीत सहभागी झाले होते.

रेवदंडा बायपास येथून सायंकाळी सहा वाजता या रॅलीला सुरुवात झाली. आंबेडकर चौक, महावीर चौक, बालाजी नाका या मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ रॅलीचा समारोप झाला. राष्ट्रध्वज घेऊन मोठ्या संख्येने नागरिक सैन्य दलातील निवृत्त अधिकारी आणि कर्मचारी हे देखील या रॅलीत सहभागी झाले होते. भाजप तर्फे गिरीश तुळपुळे, महेश मोहिते, आस्वाद पाटील, चित्रा पाटील, संजय पाटील, उदय काठे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख राजा केणी आणि त्यांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# सर्वात महागडा मियाजाकी आंबा पिकलाय कर्जतमध्ये!



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील बारणे या गावी राहणारे व पेशाने शिक्षक असलेले राजेंद्र फुलावरे यांना शेतीची प्रचंड आवड असल्याने आपल्या विभागातील शेतकरी वर्गास समृद्ध करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण प्रयोग करण्यास सुरूवात केलेली आहे. त्यांनी जगातील सर्वात महागडा मियाजाकी आंबा आपल्या शेतात पिकवलाय.

याचाच एक भाग म्हणून त्यांनी कोकणातील प्रसिध्द आणि हमखास येणारे पिक म्हणून आंब्याची ओळख आहे त्यासाठी त्यांनी विविध ठिकाणी भेटी देऊन, ऑनलाईन चर्चा करून, आपल्या शेतीत आंब्याच्या विविध जातींची लागवड केलेली आहे, यात हापूस, केशर, राजापुरी, नीलम, रत्ना, अश्या स्वरूपातील विविध देशी जाती तर विदेशी मधील थाई कॅटिमॉन, सुपर कॅटिमॉन, बनाना मँगो, टॉमी, मियाजाकी मँगो अश्या जातींची लागवड करून त्यापासून उत्पन्नही मिळण्यास सुरूवात झालेली आहे. यातील मियाजाकी आंब्याची किंमत प्रती किलोस लाखाच्या घरात आहे.

ही मियाजाकी आंब्याची जात जपान देशातील आहे. फुलावरे यांनी आपल्या शेतात फणसाच्याही देशी सोबत विदेशी बाराहून अधिक जातीची लागवड करून उत्पन्न मिळविण्यास सुरूवात केलेली आहे. त्यांनी शेतामध्ये व्हाईट जांभूळ, बहाडोली जांभूळ, लिंबूच्या अनेक जाती, काजू,चिकू,जाम, अंजीर, गोड चिंच, रेड कश्मिरी पल बोर, थाई ॲपल बोर, कोलंबस नारळसह नारळाच्या विविध जाती, पपई अश्या अनेक फळांच्या जाती लावल्या आहेत. यासह शेततळे काढून त्यात मासे पालन ही करत आहेत.

**कोकणातील शेतकरी अल्पभूधारक असल्याने त्यांनी एकाच पिकावर अवलंबून न राहता शेतीत विविध पिके घेतली पाहिजेत. शेतीत नाविन्याची कास धरली पाहिजे शेतीला जोडधंदा म्हणून फळलागवड कुक्कुटपालन, शेळीपालन, मासेपालन, यासारखे विविध व्यवसाय छोटेखानी स्वरूपात का होईना पण केले पाहिजेत. त्यामुळे शेतकरी वर्गास आर्थिक समृद्धता व स्थैर्यता प्राप्ती होईल.**

**– राजेंद्र फुलावरे, शेतकरी**

# भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ भाजपचा उपक्रम



**महाड: प्रतिनिधी**

ऑपरेशन सिंदूरच्या विजयानंतर आज महाडमध्ये समस्त महाडकारांच्यावतीने भारतीय सैन्याचे धन्यवाद व त्यांचे समर्थनार्थ भव्य अशी तिरंगा यात्रा काढण्यात आली. मंत्री भरत गोगावले बिपीन महामुणकर यांनी या यात्रेचे नेतृत्व केले.

पहेलगाम या ठिकाणी अतिरेक्यांनी भ्याड हल्ला करून २६ हिंदू पर्यटकांची निर्घृण हत्या केली त्या विरोधात संपूर्ण भारतामध्ये संतापाची लाट उसळली होती. भारताचे कणखर व खंबीर नेतृत्व समजले जाणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या हल्ल्याचे अचूक उत्तर दिले जाईल असे जाहीर केले होते, आणि एअर स्ट्राईक करून त्याचे उत्तरही दिले. सैन्य दलाकडून करण्यात आलेला या जवाबी कार्यवाही समर्थनार्थ संपूर्ण भारतात भारतीय सैन्याचा जय जयकार केला जात आहे. पाकिस्तानला चांगला धडा शिकवल्याबद्दल आज महाडमध्ये भारतीय सैन्याचे धन्यवाद व्यक्त करण्यासाठी व तिन्ही दलाच्या सैनिक समर्थनार्थ आज महाड मधून समस्त महाडकरांच्या वतीने सकाळी नऊ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून भव्य अशा तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

या यात्रेमध्ये हजारो महाडकारांनी सहभाग घेऊन भारत माता की जय ! वंदे मातरम ! व सैन्य दलाचा विजय असो अशा घोषणा देत संपूर्ण आसमंत दणाणून सोडला होता. महाडचे आमदार तथामंत्री भरत गोगावले, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस बिपिन महामुणकर यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली या रॅलीमध्ये सर्व व्यापारी पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजमुद्रा फाउंडेशनकडून महिलांना शिलाई मशीन भेट



**प्रतिनिधी : धाटाव**

रोहा तालुक्यातील सामाजिक कार्यात अग्रेसर अशी राजमुद्रा फाउंडेशन गरीब व गरजूंना मदतीसाठी कोणताही क्षणी , कोणत्याही ठिकाणी सेवा देणारी राजमुद्रा फाउंडेशनची ओळख निर्माण झालेल्या आहे . विशेषता महिला सक्षमीकरणाच्या उद्दिष्टाने अनेक महत्त्वपूर्ण या फाउंडेशनने उपक्रम हाती घेतलेला आहे . त्याचाच भाग म्हणून रोहा तालुक्यातील वाशी , रोठ बुद्रुक, रोठखुर्द , उडदवणे , भुनेश्वर , विजोली , भालगाव , कारिवणे अशा विविध भागात महिलांच्या हाताला रोजगार मिळाव्या उद्दिष्टाने राजमुद्रा फाउंडेशन ने सोल्वे कंपनीच्या सी एस आर फंडातून उत्तम दर्जाच्या दहा शिलाई चे मशीन चे वाटप करून समाजकार्याचा वसा फाउंडेशन जपलेला आहे .

यावेळी राजमुद्रा फाउंडेशन संस्थापक तथा रोहा तालुका भाजपा अध्यक्ष अमित घाग यांनी उपस्थितीत महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले की , महिलांना त्यांच्या हक्कांसाठी आणि समान संधींसाठी सक्षम करणे, तसेच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांचे योगदान वाढवणे महत्त्वाचा आहे तसेच ग्रामीण भागातील महिलांना शिलाई मशीन देशाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे ती महिला कपडे शिलाईच्या माध्यमातून स्वतःचा संसार चालू शकते राजमुद्रा फाउंडेशनच्या माध्यमातून असंख्य महिलांना अनेक कोर्सेस देण्याचे काम अविरतपणे चालु आहेतच परंतु माझ्या सर्व तालुक्यातील भगिनींना यापुढे देखील केंद्र व राज्य शासनाच्या स्कीम राबवण्यासाठी अजंठा देखील राजमुद्रा फाउंडेशन ने हाती घेतलेला आहे असे राजमुद्रा फाउंडेशन संस्थापक अमित घागने सांगितले . तर सूत्रसंचालनचे काम राजमुद्रा फाउंडेशन अध्यक्ष राजेश डाके यांनी केले व सोल्वे कंपनीचे विजय चौगुले व कंपनीचे आभार मानले.

या वेळी कंपनीचे बळवंत पेंडसे, राजमुद्रा फाउंडेशन कार्याध्यक्ष राजेश भगत , फाउंडेशनच्या महिला प्रमुख श्रद्धा घाग, मयुरी जाधव , निलिमा मोरे, सचिन मोरे, सनिल इंगावले, अरुण वाघमारे, दिपक मोरे यासह फाउंडेशनचे पदाधिकारी व महिला भगिनी उपस्थित होत्या.

# प्रकाश आंबेडकर यांनी रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व करावे –मंत्री रामदास आठवले



**खालापूर: प्रतिनिधी**

प्रकाश आंबेडकर यांचा राजकारण समाजकारणाचा अभ्यास दांडगा आहे याचा फायदा समाजाला होईल मी चार पावले मागे येतो प्रकाश आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व करावे मी तयार आहे असे भावनात्मक आवाहन केंद्रीय राज्यमंत्री रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी केले आहे

खोपोली येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे आंबेडकर जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी जनसमुदायाला संबोधीत करताना आठवले पुढे म्हणाले की बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर आणि मी राजकारणात एकत्र आलो तर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा बदल होईल त्यांचा अभ्यास दांडगा आहे ते राजकारण जेष्ठ व अनुभवी नेते आहेत.

खोपोलीत आंबेडकर जयंती निमित्त सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते उत्सव समितीचे अध्यक्ष जेष्ठ दलीत नेते काशिनाथ रुपवते, माजी नगरसेवक विशाल गायकवाड, उपाध्यक्ष प्रवीण शिंदे, रुपेश रुपवते, सलीम शेख रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड उपस्थित होते

पान १ वरुन

## प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडवण्यासाठी आता रस्त्यावरची लढाई लढणार!

ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे म्हणाले की, प्रकल्पग्रस्तांची ही लढाई लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लढणार आहोत. सिडकोचा उलवे नोड अत्यंत संवेदनशील असून सिडको कोणाच्याही घरावर कारवाई करते आणि स्थानिकांना सोयीसुविधा देत नाही. त्यामुळे याविरोधात आपली एकजूट महत्त्वाची आहे. स्मशानभूमीची जमीन वेटलँड क्षेत्रात येत असल्याचे सिडकोचे म्हणणे आहे, पण या स्मशानभूमीलगतच्या वेटलँड भूखंडावर टोलेजंग वसाहती उभ्या राहिल्या आहेत हे सिडकोला दिसत नाही का? या विरोधात आम्ही नक्कीच आंदोलन छेडू. सिडको प्रकल्पग्रस्तांना विश्वासात घेत नाही, तर हुकूमशाही पद्धतीने कारवाई करते. या हुकूमशाहीविरोधात आपण एकजुटीने उभे राहून विरोध करून सडेतोड उत्तर देऊया, असे आवाहनही म्हात्रे यांनी केले.

या वेळी ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, माजी सरपंच रत्नप्रभा घरत आदींनीही मनोगत व्यक्त केले.

## उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी

इंदापूर–माणगाव बायपासचे टेंडर निघाले आहे, परंतु लोणेरे येथील महामार्गाचे काम पूर्ण झाल्याशिवाय बायपासचे काम करणाऱ्या नवीन कंत्राटदाराला वर्कऑर्डर देता येणार नाही, अशी माहिती अधिकाऱ्यांनी या वेळी बैठकीत दिली. याबाबत उच्चस्तरावरून प्रयत्न करण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

सध्या माणगावातील बायपास तातडीने पूर्ण होणार नाही हे खरे आहे, परंतु इंदापूर ते कशेणे कालवा रोड पर्यायी मार्ग तसेच माणगाव शहरातील मोर्बा रोड, कालवा मार्ग ते मुंबई–गोवा महामार्ग असा पर्यायी मार्ग उपलब्ध करा येऊ शकतो तसेच साईनगर कालवा मार्ग, भादाव ते विंचवली हा मार्ग झाल्यास कायमस्वरूपी वाहतूक कोंडीतून सुटका होईल. माणगाव शहरातील नगरपंचायत हद्दीत उपकालवा जातो. या कालव्यालगत पाटबंधारे विभागाची जागा आहे. त्या जागेतून रस्ता बनविल्यास वाहतूक कोंडी कमी होईल. या पर्यायी मार्गांसाठी केंद्र सरकारने मदत न केल्यास राज्य सरकारच्या माध्यमातून तातडीने निधी उपलब्ध करून दिला जाईल. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तत्काळ पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्या, अशा सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी संबंधित यंत्रणेला या वेळी दिल्या.

मुंबई–गोवा महामार्गालगत अनेक छोटी मोठी गावे आहेत. तेथील नागरिक महामार्गावरून प्रवास करीत असतात. त्या नागरिकांना सेवा देणे हे आपले कर्तव्य आहे. जिथे गरज वाटेल तिथे सर्विस रोड बनविले पाहिजेत. कोकणात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. सर्विस रोड बनवत असताना तेथे पाणी साचणार नाही यासाठी बाजूला गटारेसुद्धा बांधली गेली पाहिजेत. सर्विस रोडवरून नागरिकांची मोठी वाहनेसुद्धा या बाजूकडून त्या बाजूकडे सहजरीत्या गेली पाहिजेत यासाठी योग्य ती उंची राखूनच काम केले गेले पाहिजे. नागरिकांचे हित बघूनच अधिकाऱ्याने काम करावे, अशा सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या. वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी मुंबई–गोवा महामार्गाने प्रवास करणाऱ्या अवजड वाहनांना पर्यायी मार्गाने वळविण्यात यावे, असे आदेश त्यांनी या वेळी दिले.

खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी या महामार्गाच्या कामाच्या अनुषंगाने सूचना केल्या. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले. या बैठकीला जिल्हा प्रशासन आणि राष्ट्रीय महामार्गाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## परेश ठाकूर यांच्या पुढाकारातून कुस्तीला वैभव मिळणार -ना. मुरलीधर मोहोळ

अशाच प्रकारे महाराष्ट्राने देशाला नामवंत खेळाडू दिले आहेत, ज्यात अनेक अर्जुन पुरस्कारप्राप्त खेळाडू, भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणारे अनेक खेळाडू असल्याचे सांगून अशा स्पर्धांच्या माध्यमातून पुढच्या काळात परेशशेठ यांच्या नेतृत्वाखाली या रायगड कोकणातून महाराष्ट्र आणि देशाला चांगले खेळाडू मिळतील, अशी अपेक्षा मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त करीत वाढदिवसानिमित्त त्यांचे अभीष्टचिंतन केले.

या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार विक्रांत पाटील, युवा मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे, हिंद केसरी योगेश दोडके, संदीप बोंडवे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, हरचरणसिंग सग्गु, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगरसेवक जयंत पगडे, अनिल भगत, गणेश कडू, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, विजय चिपळेकर, स्पर्धा संयोजक अल्पसंख्याक आयोगाचे प्रदेश सदस्य हॅप्पी सिंग, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, पैलवान रूपेश पावशे, कामोठे युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, बळीराम पाटील, संजय भगत, योगेश लहाने, अनेश ढवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आतंरराष्ट्रीय दर्जाचे मैदान, उत्तम आणि दिमाखदार नियोजन, आकर्षक रोषणाई, हलगीचा ताल, मर्दानी आवाजात सूत्रसंचालन आणि हजारो कुस्ती रसिकांच्या उपस्थितीत राज्य, राष्ट्रीय दिग्गज व नामवंत कुस्तीपटूंचे मुख्य व रोमहर्षक सामने झाले. त्याचबरोबर स्थानिक, जिल्हा आणि महाराष्ट्रातील इतर पैलवानांचे वयोगटानुसार गटनिहाय सामने मोठ्या उत्साहात झाले.

**मुख्य स्पर्धेचा निकाल**

**पुरुष कुस्ती :**

रुस्तम–ए–हिंद सिकंदर शेख विरुद्ध हिंद केसरी सुखविंदर सिंह = **सिकंदर शेख विजयी**

ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी विरुद्ध रिकार्डो अमेरिका (अमेरिका) = **विजय चौधरी विजयी**

डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे विरुद्ध हिंद केसरी विक्रांत कुमार = **शिवराज राक्षे विजयी**

उपमहाराष्ट्र केसरी किरण भगत विरुद्ध हिंद केसरी हितेंद्र कुमार = **किरण भगत विजयी**

**महिला कुस्ती :**

अमेघा घरत विरुद्ध सुमन शर्मा = **अमेघा घरत विजयी**

सृष्टी भोसले विरुद्ध सोनिया तोमर = **सृष्टी भोसले विजयी**

# दीपिका म्हात्रे यांची प्रेरणादायी वाटचाल

## ३७व्या वर्षी झाल्या दहावी उत्तीर्ण

**पाली : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील दिव गावातील दिपिका म्हात्रे या गरिबी व अपंगत्वावर मात करत रायटर नाकारून स्वतः पेपर लिहून वयाच्या ३७ व्या वर्षी दहावी उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांनी तब्बल ६९.२०% गुण मिळवून यश मिळवले आहे.



प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या सेकंड चान्स प्रोग्राममधून शिक्षणाची संधी मिळवून आपली जीवन दिशा बदलणाऱ्या महिलांपैकी त्या एक आहेत. दीपिका यांचे माहेरचे जीवन अतिशय गरिबीत गेले. त्यामुळे नववीपर्यंत शिक्षण घेता आले. आणि त्यांनतर लग्न झाले. पण सासरीही परिस्थिती हालाखीचीच होती. पती–पत्नी मजुरी करून घर चालवत होते. गर्भधारणेच्या वेळी त्यांना संधीवाताचा तीव्र झटका आला, आणि त्यात ६०% अपंगत्व आले. त्यांचं अपत्यही दोन्ही पायांनी अधू जन्माला आले. इतक्या संकटांमध्येही शिक्षणाची आस मनात टिकून होती, पण त्याग करावा लागला.

प्रथम संस्थेच्या 'हमारा गाव' उपक्रमाअंतर्गत दिव गावात सर्वे करताना दिपिका भेटल्या. पहिल्याच भेटीत त्यांच्या डोळ्यात शिक्षणाची आस दिसली. प्रथमच्या कार्यकर्त्यांनी त्यांना विश्वास दिला, आणि त्या दहावीसाठी तयार झाल्या. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी सुरुवातीला त्यांच्याकडे जाऊन शिकवणं सुरू केले. त्यांना केंद्रावर येणं कठीण होतं, पण त्यांचे पती त्यांना हात धरून आणायचे. नंतर इतर विद्यार्थी महिला त्यांना घेऊन यायच्या. त्यांनी कधीही वर्ग चुकवला नाही. अभ्यास नियमितपणे केला, ग्रुपवर होमवर्क पाठवत राहिल्या. त्यांना काही मजले चढून परीक्षा द्यावी लागायची, पण वर्गमित्र व मैत्रिणी त्यांच्या मदतीला धावून यायच्या.

परीक्षेवेळी दीपिका यांना राईटर देण्यात येणार होता, पण त्यांनी ठाम नकार दिला. मला शिकायचं आहे तर पेपर मीच लिहणार, असं त्यांनी सांगितले. त्यांचा हात अधू असतानाही त्यांनी स्वतः पेपर लिहिले. त्यांना बारावी आणि पुढील शिक्षण पूर्ण करायचं आहे. प्रथम संस्था यासाठी मार्गदर्शन करणार.

# खारघर येथे तिरंगा यात्रा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतात राहून ज्यांना पाकिस्तानचा पुळका येतो, अशा लोकांना ओळखून त्यांना समाजातून वेगळ करू तेव्हाच आपण आपले नागरिक कर्तव्य योग्यरित्या निभावू असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर येथे तिरंगा यात्रेवेळी केले.

ऑपरेशन सिंदूर या लष्करी मोहिमेतील भारतीय सशस्त्र दलाच्या अतुलनीय शौर्याचा गौरव करण्यासाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाचा सन्मान करण्याच्या उद्देशाने रविवारी खारघरमध्ये भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली. या यात्रेत मोठ्या संख्येने नागरिक, माजी सैनिक आणि विविध हिंदू संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. ही तिरंगा यात्रा खारघरमधील शिल्पचौक सेक्टर २१ पासून सुरू झाली. यानंतर डेली बाजार,



भाजपा ऑफिस, चेरोबा मंदिर, शनि मंदिर सेक्टर ११, नवरंग चौक, खारघरचा राजा मार्गे जाऊन सेक्टर १२ मधील श्री राम जानकी मंदिरात यात्रेची सांगता झाली.

या यात्रेचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर आणि जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यात्रा संयोजक म्हणून ब्रिजेश पटेल आणि सहसंयोजक म्हणून दीपक शिंदे यांनी काम पाहिले. याशिवाय खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यु पाटील, शत्रुघ्न काकडे, नीलेश बाविस्कर, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, हर्षदा उपाध्याय, गुरुनाथ गायकर, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार आदी यात्रेत सहभागी झाले होते.

विश्व हिंदू परिषद, हिंदू जागरण मंच आणि बजरंग दल यांसारख्या संघटनांच्या कार्यकर्त्यांनीही यात्रेत मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. तसेच, माजी सैनिक कर्नल अमरजीतसिंह वधावन, कर्नल के. के. चौहान, कॅप्टन पूरनचंद सिंग, लेफ्टनंट चंद्रभान सिंह आणि रामकुमार चौधरी यांनीदेखील उपस्थिती दर्शवली. खारघरमधील सर्व हिंदू संघटना आणि अनेक देशभक्त नागरिकांनी उत्स्फूर्तपणे यात्रेत सहभाग घेऊन भारतीय जवानांच्या शौर्याला आणि नेतृत्वाला आदराने अभिवादन केले.



**उरण : ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ सोमवारी तिरंगा यात्रा काढण्यात आली. या वेळी आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते रवी भोईर, महिला तालुका अध्यक्ष राणी म्हात्रे, माजी नगरसेवक कौशिक शाह आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.**



**कळंबोली : भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ एक सामान्य माणसाची मानवंदना म्हणून भाजप कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर अरुण पाटील यांच्या नेतृत्वखाली तिरंगा पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे तसेच माजी सैनिक उपस्थित होते.**

# पनवेलच्या आंबा महोत्सवाला नागरिकांचा भरघोस प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते आणि तरुणांचे प्रेरणास्थान असलेले परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल शहरात विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील गुजराती शाळेच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेला आंबा महोत्सव या कार्यक्रमांचे प्रमुख आकर्षण ठरला. या महोत्सवात अभंग रिपोस्ट आणि वारसा संस्कृतीचा या नावाने संगीत, नृत्य आणि कलेचा अनोखा संगम साधणारे सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले, ज्याला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.



रविवारी या महोत्सवाची सांगता झाली. सांगता समारंभाला आमदार विक्रांत पाटील आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते आंबा महोत्सवातील सर्व स्टॉल धारकांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे परेश ठाकूर यांचा अभिष्टचिंतन सोहळा झाला.

या सोहळ्यादरम्यान आमदार विक्रांत पाटील, भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, व्यापारी आघाडीचे अध्यक्ष संजय जैन, महिला मोर्च्याच्या पनवेल शहर अध्यक्ष रुचिता लोंढे-समेळ, सरचिटणीस अमित ओझे, रुपेश नागवेकर, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, प्रवीण मोरबाळे, अमय देशमुख, आदित्य देशमुख, प्रीतम म्हात्रे, स्वाती कोळी यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि मान्यवरांनी परेश ठाकूर यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान, कामोठे येथे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक गणेश कडू, अभिमन्यू पाटील, शत्रूघ्न काकडे, तेजस कांडपीळे, वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, संजय भगत, श्यामनाथ पुंडे, किशोर चौतमोल, अभिषेक भोपी, विनोद नाईक, दामोदर चव्हाण, सुशील शर्मा, गणेश कोळी, केदार भगत, वासुदेव पाटील, गौरव कांडपीळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी परेश ठाकूर यांचे अभीष्टचिंतन केले. याचबरोबर, प्रशिक ग्रुप ऑफ अनॅलिसीस यांच्यावतीने शासकीय विश्रामगृहात परेश ठाकूर यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला.

या वेळी आरपीआयचे राष्ट्रीय सचिव बरशिंगे साहबे, पनवेल तालुका कार्याध्यक्ष मोहन गायकवाड, पनवेल युवाचे संपादक निलेश सोनावणे, अल्लाउद्दीन शेख, नंदकुमार गायकवाड, आरपीआयचे मोनिश गायकवाड आदी उपस्थित होते.

# कोस्टल मदत कक्षासाठी जनजागृती

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील रहिवाशांना कोस्टल हेल्पलाईन नंबर १०९३ माहिती व्हावा, यासाठी खारघर पोलीस ठाण्याच्या वतीने काढण्यात आलेल्या दुचाकी रॅलीला रहिवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

खारघर हे नवी मुंबईतील एक महत्त्वाचे शहर असून खाडीकिनाऱ्यालगत आहे. बेलापूर ते तळोजा गाव हा परिसर खाडीकिनारा परिसर म्हणून ओळखला जातो. खाडी भाग, तसेच समुद्रात काहीतरी संशयास्पद हालचाल दिसल्यास किंवा मदतीची आवश्यकता असल्यास आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ सागरी सुरक्षा दलासाठी १०९३ हा कोस्टल हेल्पलाईन आहे. या हेल्पलाइनची माहिती होण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी खारघर पोलिस ठाण्याच्या वतीने खारघर परिसरात दुचाकी रॅली काढण्यात आली होती.

या रॅलीत जवळपास ४०हून अधिक दुचाकी आणि निर्भया वाहनसह वाहतूक विभाग, सागररक्षक दल आणि खारघर पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.खारघरवासीयांना १०९३ या कोस्टल हेल्पलाईनची माहिती व्हावी, यासाठी रॅलीतील दुचाकींवर फलक लावण्यात आले होते.

या रॅलीविषयी खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दीपक सुर्वे म्हणाले, समुद्रात काहीतरी संशयास्पद दिसल्यास किंवा मदतीची आवश्यकता असल्यास सागररक्षक दलांना संपर्क साधता यावे, यासाठी १०९३ ही कोस्टल हेल्पलाईन आहे. या रॅलीत पोलिस आणि सागरी सुरक्षा दलाचे जवळपास ६०हून अधिक कर्मचारी सहभागी झाले होते.

# अपघातात बुलेटस्वार ठार

**पनवेल : वार्ताहर**

एका अज्ञात वाहनाच्या धडकेत बुलेटस्वार गंभीर जखमी होऊन मयत झाल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

ओमकार शिंत्रे (वय २२, रा.कोपरखैरणे) हे बुलेटवरुन आपल्या घरी जात असताना कुंडेवहाळ येथे आले. याचवेळी कंटेनरने ब्रेक मारल्याने त्यांनी त्यांच्या ताब्यातील बलुटचा ब्रेक मारल्याने मोटरसायकल स्लीप होवून ओमकार शिंत्रे व त्याचा मित्र खाली पडले. तेव्हा पाठीमागून येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्याच्या वाहनाचे चाक मयत ओमकार शिंत्रे याच्या तोंडावरुन जावून त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याबाबतचा अधिक तपास पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ करीत आहेत.

# महिला पोलिसावर अत्याचार; उपनिरीक्षकावर गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिला पोलिसावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षकावर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यात या पोलीस उपनिरीक्षकाच्या आईलाही सह आरोपी करण्यात आले आहे.

मार्च २०२० मध्ये आरोपी पोलिस उपनिरीक्षकाची ओळख तो तळोजा पोलीस ठाण्यात कार्यरत असताना पीडित महिला पोलिसासोबत झाली. त्यानंतर त्यांच्यात मैत्री झाली आणि मार्च २०२० मध्ये चहा पिण्याच्या बहाण्याने त्याच्या भावाच्या महालक्ष्मीनगर, नेरे येथील रूमवर नेऊन चहा मध्ये गुंगीकारक औषध टाकले आणि पोलीस महिलेसोबत जबरदस्तीने लैंगिक अत्याचार करून तिचे अर्ध नग्न फोटो काढले आणि हे फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन पोलीस ठाण्यात तक्रार केली तर आत्महत्या करेल अशा वेगवेगळ्या प्रकारच्या धमक्या दिल्या. तसेच त्यांना लग्न करण्याचे आश्वासन दिले.

एप्रिल २०२० ते एप्रिल २०२५ या कालावधी दरम्यान करंजाडे येथे पीडित पोलीस महिला राहत असलेल्या रूमवर तिच्यावर अत्याचार केला. तसेच चार चाकी गाडी घ्यायची असल्याने पीडित महिलेकडे पाच लाख रुपयांची मागणी केली आणि ते न दिल्यास त्यांचे अर्धनग्न फोटो त्यांच्या मुलाला दाखवण्याची धमकी दिली आणि त्यांच्याकडून दोन लाख रुपये ऑनलाईन आणि तीन लाख रुपये रोख स्वरूपात घेतले. तसेच पीडित महिलेला जातीवाचक बोलून शिवीगाळ आणि अपमानास्पद वक्तव्य करून अपमान केला. पीडितेने याबाबतची माहिती पोलीस उपनिरीक्षकाच्या आईला दिली असता तिने देखील जातीवरून शिवीगाळ केली आणि अपमान केला. त्यामुळे दोघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात ट्रॉसिटीअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

# उरणमध्ये विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात

**उरण : वार्ताहर**

को.ए.सो. हायस्कूल केळवणे तसेच इंग्लिश मेडीयम स्कूल वशेणी यांतील शालांत परीक्षा दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळवून यश संपादित केल्याबद्दल केळवणे गावचे समाजसेवक, तसेच जीवनगौरव



पुरस्कार सन्मानित अनंत नाथा माळी यांनी सालाबादप्रमाणे यंदाही विशेष सत्कार केला.

विद्यार्थ्यांना शालोपयोगी वास्तु पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करून उज्वल भविष्याकरिता मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या. केळवणे गावातील प्रथम अंश अमोल पाटील ९१.८० टक्के, द्वितीय प्रेम दिलीप पाटील ९०.४० टक्के, तिसरा श्रुती संजय कोळी ८६.८० टक्के, समीर निलेश घरत ८६.८० टक्के आलेल्याचा विशेष अभिनंदन करण्यात आले.

या वेळी रवींद्र नाथा माळी, अमित नामदेव पाटील, माणिक रामदास पाटील, संजय कोळी तसेच गावचे पोलीस पाटील शशिकांत ठाकूर आदी उपस्थित होते.

# उरणकरांना अभिमान वाटावा असे मधुबन कट्टाचे कार्य -गोपाळ पाटील

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरणकर दर महिन्याच्या १७ तारखेला आनंद घेतो, तो विमला तलावावर होणाऱ्या मधुबन कट्ट्यावर होणाऱ्या कविसंमेलनाचा येथे विशेष होते तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांचा जीवनगौरवांचा सन्मान याच ठिकाणी कोकण मराठी साहित्य परिषदेकडून जवळजवळ १५० हून अधिक ज्येष्ठांना सन्मानित करण्यात आले आहे. ते शाखेचे उरणकरांना अभिमान वाटावे असे कार्य आहे, असे उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील यांनी विचार मांडले.

गौरव मूर्ती नाट्यकर्मी कमलाकर घरत यांनी सुचविले की, १५० व्या कार्यक्रमात उरणातील सर्व गौरव प्राप्तींचा एक मोठा सोहळा ठेवावा. कार्यक्रमाचे अध्यक्ष संग्राम तोगरे यांनी उरणची कोमसाप ही उरणकरांना आनंद देणारी शाखा आहे, असे मत व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे गोपाळ पाटील यांच्या हस्ते गौरव मूर्तींना सन्मानित करण्यात आले. मच्छिंद्र घरत, भुवनेश पाटील, तानाजी गायकर, जनार्दन म्हात्रे, सुरेश भोईर, अनंत पाटील, रवींद्र सूर्यवंशी, वसंत कुंडल, आर.सी. गावंड, अरविंद घरत आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी झालेल्या कविसंमेलनात कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप) शाखाध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे यांनी सुरेख सूत्रसंचालन केले. अनिल भोईर, अजय शिवकर,संजीव पाटील मारूती तांबे, गजानन म्हात्रे, किशोर म्हात्रे, अनामिका राम, नरेश पाटील, बालकवी अनुज शिवकर, रमेश धनावडे, गोपाळ पाटील आदींनी कविता गायले. एल बी पाटील यांनी कवितेनंतर सुमधुर आवाजात आगरी बोलीत पसायदान सादर करून सर्वांना वेगळा आनंद दिला.

उपस्थितांचे आभार माजी माध्यमिक शिक्षक संजीव पाटील यांनी मानले. एकंदरीत कविसंमेलन मोठ्या उत्साहात, उत्तम प्रतिसादात झाले.



# खारघरमधील अतिक्रमण जमीनदोस्त

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर ३५ परिसरात सिडकोच्या भूखंडावर अतिक्रमण करून सुरू असलेल्या बेकायदा चिकन, मटण विक्रेत्यांची दुकाने पालिकेने काढून टाकली. तसेच रस्ते डांबरीकरणाचे काम सुरू असल्यामुळे रहिवासी समाधान व्यक्त करीत आहेत.

खारघर परिसरात सिडकोच्या राखीव भूखंडावर अतिक्रमण करून काही चिकन, मटण विक्रेत्यांनी दुकाने थाटली होती. एका मेडिकलच्या मागे अनधिकृत मदरसा उभारण्यात आल्यामुळे वाहतूक कोंडी होत असून, रस्त्यांची दुरवस्था झाली - होती. ही समस्या दूर व्हावी, यासाठी सेक्टर ३५मधील हाइड पार्कमधील पदाधिकाऱ्यांनी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांना निवेदन दिले होते. यासंदर्भात मंगळवारी (दि.१३) 'खारघरमधील बेकायदा दुकाने हटवा' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध झाले होते. याची दखल घेत पनवेल महापालिकेच्या अतिक्रमण नियंत्रण विभागाने मोकळ्या भूखंडावरील अतिक्रमण करून उभारलेली चिकन, मटण व इतर दुकाने जमीनदोस्त केली. तसेच परिसरातील रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पालिकेकडून हाती घेतल्यामुळे रहिवासी समाधान व्यक्त करीत आहेत.

हाइड पार्क सोसायटीचे पदाधिकारी संगीता शुक्ला म्हणाल्या, की दुकाने हटविल्यामुळे परिसर मोकळा झाला असून या भूखंडावर रोप लागवड करण्यात आली आहे. परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण सुरू व्हावे. यासाठी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, स्थानिक कार्यकर्ते विनोद घरत यांनी सहकार्य केले.

# उरणच्या बाजारात रानमेवा विक्रीसाठी दाखल

**उरण : प्रतिनिधी**

उन्हाळयात रानातील गुणकारी, रानमेवा बाजारात विक्रीसाठी येतो. उरणच्या बाजारपेठेतही रानमेवा दाखल झाला आहे. वर्षभरातील फक्त उन्हाळ्यात मिळणाऱ्या विविध प्रकाराच्या या रुचकर रानमेव्याची चव चाखायला खवय्ये उत्सुक असल्याने खरेदीसाठी त्यांची गर्दी होऊ लागली आहे.



दरवर्षी मे महिन्यांपासून जंगलामध्ये नैसर्गिकरीत्या तयार झालेला रानमेवा मोठ्या प्रमाणावर बाजारात दाखल होतो. यामध्ये काळी पिकलेली व हिरवी करवंदे, कैरी, अंजीर, काजू, काजू बिया, जांभळे, रांजणं, कोकम आदी विविध प्रकारच्या रानमेव्यांचा समावेश असतो.

या रानमेवामुळे आदिवासींना सीझन पुरता रोजगारही मिळत असतो. रानातील काळी मैना म्हणून करवंदांची ओळख आहे.तर हिरवी गार करवंदांचा ठेचा तयार केला जातो. असह्य करणाऱ्या उन्हामध्ये अगदी पटकन तोंडात टाकता येणाऱ्या आणि खायला रुचकर असणाऱ्या या रानमेव्यांला सीझनमध्ये सर्वाचीच मागणी असते. शरीराला थंडावा देणारा आणि औषधी गुणधर्म असणारा रानमेवा चाखायला सर्वानाच ओढ लागलेली असते.

रुचकर, स्वस्त आणि औषधी असे बहुउपयोगी असलेल्या या रानमेव्याची सर्वानाच भुरळ पडत असते. दुर्गम भागात राहणारे अदिवासींचे आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणून ओळखले जाते. डोंगरातील रानमेवा असून उन्हाळ्याच्या दिवसामध्ये पटकन तोंडात टाकता येणारा तसेच शरीराला आणि मनाला गारवा देणार्या या रानमेव्याला अधिक मागणी दिसत आहे.उरणच्या बाजारातही रानमेवा दाखल झाला आहे. रानमेवा खरेदीसाठी खवय्यांचा अधिक ओढा दिसतो आहे.

जांभळे- ३०० रुपये किलो, रांजणं-५० रुपये वाटा, करवंद -२५-३० रुपये वाटा,सोललेले ओलो काजू -२५ रुपये वाटा, कोकम- २० रुपये वाटा आदी दराने रानमेवा विकत असल्याचे द्रुपदा कातकरी या महिला विक्रेत्यांनी सांगितले. तर वाढत्या विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याने

वनसंपदा, जंगले नष्ट होत चालली आहे. त्यामुळे रानमेवा मिळण्याचे प्रमाण कमी झाले असल्याचे वत्सला वारीक या महिला विक्रेत्यांनी सांगितले.

## संपादकीय

# काँग्रेसचे संकुचित राजकारण

पहलगाममधील अवघ्या देशाला सुन्न करणाऱ्या दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारने कठोर पावले उचलत 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. यातून दहशतवादाविरोधातील भारताची खंबीर भूमिका स्पष्ट झालीच. आपल्या सैन्य दलांनी पाकिस्तानविरोधात अभूतपूर्व यश मिळवल्यानंतर जागतिक स्तरावर सर्वपक्षीय शिष्टमंडळे पाठवून देशाची भूमिका मांडणे अत्यावश्यकच आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन एकता दर्शवण्याची ही वेळ असताना, यातही शशी थरुर यांच्या निवडीवरून काँग्रेसने संकुचित राजकारण केलेच याला काय म्हणावे?

**'आॅपरेशन सिंदूर'नंतर दहशतवादाविरुद्ध कठोर कारवाईचा संदेश जागतिक स्तरावर नेण्यासाठी आणि पाकिस्तानविरोधातील राजनैतिक लढाई भक्कम करण्याच्या दृष्टीने सात खासदारांच्या नेतृत्वात सर्वपक्षीय शिष्टमंडळाची घोषणा केंद्र सरकारने शनिवारी केली. यात विविध पक्षांचे खासदार, माजी मंत्री आणि आठ माजी राजदूतांसह एकूण ५९ जणांचा सहभाग असलेली सात शिष्टमंडळे जाहीर करण्यात आली. प्रत्येक शिष्टमंडळात सहा ते सात खासदार आहेत. २३ मेपासून हे शिष्टमंडळ जगभरातील ३२ देशांमध्ये पाठवण्यात येणार आहे. शशी थरुर (काँग्रेस), रविशंकर प्रसाद (भाजप), संजय कुमार झा (जेडीयू), बैजयंत पांडा (भाजप), कनिमोळी करुणानिधी (द्रमुक), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी-शरद पवार) आणि श्रीकांत शिंदे (शिवसेना) यांच्या नेतृत्वाखाली हे दहा दिवसांचे 'आऊटरीच मिशन' असणार आहे. कार्यक्रमाची घोषणा झाल्यानंतर लगेचच कोण कुठे जाणार आहे याची संपूर्ण यादी जाहीर करण्यात आली. असे शिष्टमंडळ पाठवण्याच्या संकल्पनेचे सर्व स्तरातून स्वागत होत असतानाच विरोधकांनी या उपक्रमाबाबतही संकुचित राजकारणाच्या दृष्टिकोनातून वाद निर्माण करण्याचाच प्रयत्न केला. देश एका युद्धसदृश परिस्थितीतून सावरत असतानाही विरोधकांमध्ये विवेकबुद्धिचा व देशाविषयीच्या प्रामाणिक भावनेचा अभाव दिसतो हे दुर्दैवीच म्हटले पाहिजे. काही नेहमीच्याच वाचाळवीरांनी सरकारच्या या प्रयत्नांची 'पर्यटन' म्हणून संभावना केली. तर पक्षाने शशी थरुर यांचे नाव सुचवलेले नसतानाही सरकारने त्यांचे नाव शिष्टमंडळाचे प्रतिनिधी म्हणून घेतलेच कसे असा सवाल काँग्रेस पक्षाने उपस्थित केला. वास्तविक संयुक्त राष्ट्रांतील कामाचा अनुभव, आंतरराष्ट्रीय राजकारणाचे ज्ञान तसेच राजनैतिक मांडणीचे कौशल्य या निकषांवर थरुर यांचा या शिष्टमंडळांतील समावेश सहज पटणारा आहे. उलट काँग्रेस पक्षानेच आपल्या या अनुभवी नेत्याला डावलणे अनाकलनीय आहे. कदाचित पहलगाम हल्ल्यानंतर मोदी सरकारने घेतलेल्या सर्व निर्णयांचे थरुर यांनी समर्थन केल्याचे काँग्रेस पक्षाला रुचलेले नसावे. स्वत: थरुर यांनी मात्र सरकारकडून आपल्याला शिष्टमंडळाबाबत विचारणा झाल्यानंतर आपण त्याबाबत पक्षालाही कळवले. पक्षाकडून सरकारला दिलेल्या नावांच्या यादीबाबत आपल्याला माहिती नसल्याचेही थरुर यांनी सांगितले. अशातच काँग्रेसमधील ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी 'काँग्रेसमध्ये असणे आणि काँग्रेसचे असणे' यात फरक आहे असे विधान करून या वादाला वेगळाच रंग दिला. थरुर यांच्या केरळ या राज्यात पुढील वर्षी विधानसभेची निवडणूक आहे. अशात थरुर पक्षातून बाहेर पडल्यास काँग्रेस पक्षाला मोठा फटका बसू शकतो अशीही चर्चा या साऱ्यामुळे सुरु झाली. परंतु सरकारने शिष्टमंडळाचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांची निवड सार्वजनिक जीवनातील कामाचा अनुभव पाहून केल्याचे केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले. थरुर यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावर छाप पाडणाऱ्या नेत्याचे नाव काँग्रेसने न सुचवल्याबद्दल भाजपने आश्चर्यही व्यक्त केले. त्यांचे वक्तृत्व, संयुक्त राष्ट्रांत काम करण्याचा अनुभव आणि परराष्ट्र धोरणांबाबत सखोल ज्ञान कोणीही नाकारू शकत नाही.**

# माणगावात बायपास करणे हाच पर्याय





**खबरबात**
सलिम शेख/संतोष सुतार

माणगाव शहरातील मुंबई गोवा महामार्गावरील दुतर्फा असलेली अनाधिकृत आणि बेकायदेशीर बांधकामे, टपरीधारक, हातगाड्या नगरपंचायती मार्फत हटविण्यात आल्या. तरीही माणगाव शहरातील वाहतूक कोंडी कायम राहीली आहे. अशा प्रकारे वाहतूक कोंडी सुरळीतपणे करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मात्र सामान्यांना आणि प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. हे सर्व उपाय आणि प्रयत्न निष्फळ ठरत आहेत. यावर रामबाण उपाय म्हणजे बायपास तातडीने करणे हा आहे. मात्र आता पावसाळा सुरू झाल्याने हा बायपास होण्याची उरलीसुरली आशा देखील मावळली आहे. त्यामुळे या वर्षीही शहरातील वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागणार आहे.

माणगाव शहरातील वाहतूक कोंडी सुरळीतपणे होण्यासाठी प्रांताधिकारी कार्यालयात दोनदा बैठका झाल्या. त्या बैठकीत विविध प्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या. त्या काही अंशी अमलात आल्या. त्यानंतर दोन दिवस रस्त्यावरील टपरीधारक आणि हातगाड्या नगरपंचायतीने हटविल्या. परंतु हे सर्व उपाय प्रचंड रहदारीमुळे अयशस्वी ठरले आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर वाढतच चालली आहे. जोपर्यंत माणगाव आणि इंदापूर बायपास होत नाही तोपर्यंत अपघातात नाहक बळी जात राहणार आहेत. तसेच माणगावातील नागरीक आणि प्रवाशांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार आहे.

पावसाळ्यात महामार्ग कालवा मार्ग ते मोरबा रोड हा अंतर्गत रस्त्यांसाठी शासनाने वेळेवर निधी उपलब्ध करून न दिल्यामुळे हा बहूपर्यायी मार्ग पुर्णपणे अर्धवट अवस्थेत असल्याने बंद राहणार आहे. या रस्त्यावरून अंतर्गत मार्गाने मुंबई, पूणे आणि श्रीवर्धन, हरिहरेश्वर, म्हसळा या ठिकाणी शहरातील बाजारपेठेतून न जाता ये जा करण्यासाठी शॉर्टकट होता. परंतु तोही एकमेव मार्ग बंद होणार असल्याने शहरातील वाहतूक कोंडीवर अधिकचा ताण वाढतच जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना महामार्गावरून जाताना जीव मुठीत धरूनच बाजारहाट करण्यासाठी जीवाला धोका पत्करून जावे लागणार आहे. पावसाळ्यात फक्त बाजारपेठेतील महामार्गावरच अवलंबून राहावे लागणार आहे.

जून महिन्यात सर्व शाळा आणि कॉलेज सुरू आहेत. माणगाव शहरातील विविध शाळा कॉलेज मधून सुमारे २० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडीवर मोठा दुष्परिणाम होऊन अनेक वेळा वाहतूक व्यवस्था ठप्प होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरात अंतर्गत कचेरी रोड, निजामपूर रोड, बामणोली रोड, मोरबा रोड हे चार प्रमुख मार्ग नेहमीच रहदारीने गजबजलेले असतात. हे रस्ते खूप अरुंद अवस्थेत आहेत. त्यामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक रहदारी आणि नागरीकांची गर्दी होत असते. त्यात विद्यार्थ्यांचीही भर पडणार असल्याने वाहतूक कोंडीत माणगावकरांचे मोठे हाल सोसावे लागणार आहेत.

माणगाव पोलिस ठाण्यात पोलिस कर्मचारी वर्ग अपुरा आहे. त्यामुळे वाहतूक पोलीसांवर प्रचंड मानसिक आणि शारीरिक ताण वाढतच आहे. वारंवार मागणी करूनही पोलिस कर्मचारी यांची क्षमता वाढवत नसल्यामुळे वाहतूक कोंडीवर दुरगामी परीणाम झाला आहे. पोलिस कर्मचार्याची कमतरता असल्याने बरेच जण वाहतूकीचे नियम धाब्यावर बसवून कुठेही आणि कसेही करून वाहने पूढे रेटत असतात. त्यामुळे वाहतूक कोंडी होत असते.

महामार्गावरील रेल्वे स्थानक, ढालघर फाटा, दत्त नगर, कालवा मोरबा रोड, विकास कॉलनी कॉर्नर, बामणोली रोड येथे पोलिस बंदोबस्त ठेवण्यात यावा अशी मागणी केली जात आहे. केवळ बाजारात पोलिस बंदोबस्त तैनात करून वाहतूक कोंडी सुरळीत होत नाही हे दिसून येत आहे. वाहतुकीच्या कोंडीतून मुक्तता मिळवण्यासाठी माणगाव आणि इंदापूर बायपास तातडीने करणे अत्यंत आवश्यक आहे अशी नागरिकांची मागणी आहे.

माणगावचा बायपास झाल्यास वाहतूक कोंडी सुरळीतपणे होईल. त्याचबरोबरीने अपघातावर आळा बसेल. माणगावातील नागरीक मोकळा श्वास घेऊ शकतील. नागरिक आणि विद्यार्थी चालणे सोयीस्कर होईल. व्यावसायिक, व्यापारी, दुकानदार यांच्या धंद्यात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे मदत होऊन वाढ झालेली दिसून येईल.

या महामार्गाची राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह खा. सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे दि. १८ मे २०२५ रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नियोजित दौऱ्यात ढालघर फाटा येथे पाहणी करणार होते. रवाळजे, निजामपूर, गांगवली मार्गे ते ढालगर फाटा येथे पाहणी करून समस्या जाणून घेणार होते. परंतु, मुंबई गोवा महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे ते हेलिकॉप्टर द्वारे लोणेरे येथे आले व त्यांनी लोणेरे येथे महामार्गाची पाहणी केली.

त्यानंतर घेतलेल्या बैठकीत पनवेलपासून ते महाड पर्यंत मुंबई गोवा महामार्गाचा आढावा घेण्यात आला. माणगाव व इंदापूर येथील वाहतूक कोंडी विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना चांगले धारेवर धरले. नेहमीप्रमाणे अधिकाऱ्यांनी सारवासारवीची उत्तरे देत पुन्हा एकदा महामार्गाचे काम लांबणीवर जाईल असे सांगितले.

सध्या माणगावातील बायपास तातडीने पूर्ण होणार नाही हे खरे आहे. परंतु, इंदापूर ते कशेणे कालवा रोड पर्यायी मार्ग तसेच माणगाव शहरातील मोर्बा रोड, कालवा मार्ग ते मुंबई गोवा महामार्ग असा पर्यारी मार्ग उपलब्ध करा येऊ शकतो. तसेच साईनगर कालवा मार्ग, भादाव ते विंचवली हा मार्ग झाल्यास कायमस्वरूपी वाहतूक कोंडीतून सुटका होईल. माणगाव शहरातील नगरपंचायत हद्दीत उपकालवा जातो. या कालव्यालगत पाटबंधारे विभागाची जागा आहे. त्या जागेतून रस्ता बनविल्यास वाहतूक कोंडी कमी होईल. या पर्यायी मार्गांसाठी केंद्र सरकारने मदत न केल्यास राज्य सरकारच्या माध्यमातून तातडीने निधी उपलब्ध करून दिला जाईल. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तत्काळ पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्या असे आदेश ना. पवार यांनी अधिकाऱ्यांना दिले.

इंदापूर माणगाव बायपासचे टेंडर निघाले आहे. परंतु, लोणेरे येथील महामार्गचे काम पूर्ण झाल्याशिवाय बायपासचे काम करणाऱ्या नवीन कंत्राटदाराला वर्क ऑर्डर देता येणार नाही अशी माहिती अधिकाऱ्यांनी यावेळी बैठकीत दिली. त्यामुळे माणगाव, इंदापूर बायपासला मुहूर्त कधी मिळणार? इंदापूर, माणगाव बायपास पूर्ण करण्यासाठी १८ महिन्याचा कालावधी लागणार असल्याची माहिती यावेळी कंत्राटदाराने दिली. परंतु अद्याप पर्यंत नवीन ठेकेदाराला वर्क ऑर्डरच मिळालेली नाही.

मात्र आता पावसाळा सुरू झाल्याने हा बायपास होण्याची उरलीसुरली आशा देखील मावळली आहे. त्यामुळे या वर्षीही शहरातील वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागणार आहे.




## बदलते तंत्रज्ञान

# डिजिटल रेशन कार्डची सुविधा आता मोबाईलवर

डिजिटल रेशन कार्ड: 'Mera Ration २.०' अॅपने रेशन कार्ड आता मोबाईलवर, धान्य मिळवणे सोपे.

आज, रेशन कार्ड हे केवळ अन्नधान्याच्या वितरणासाठीच नव्हे, तर विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी आणि ओळखपत्र म्हणूनही महत्त्वाचे दस्तऐवज मानले जाते.



रेशन कार्ड हे सरकारमान्य ओळखपत्र मानलं जातं. हे कुटुंबातील सदस्यांची अधिकृत माहिती दर्शवतं. अनेक शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी याचा आधार घेतला जातो.पत्त्याचा आणि ओळखीचा पुरावा म्हणून विविध ठिकाणी वापर केला जातो. पासपोर्ट, गॅस कनेक्शन, बँक खाते उघडण्यासाठीही ते उपयुक्त ठरतं. ग्रामीण भागात तर हे सर्वात महत्त्वाचं ओळखपत्र मानलं जातं. रेशन कार्ड हे अनेक कुटुंबांसाठी केवळ ओळखपत्र नाही तर स्वस्त दरात अन्नधान्य मिळवण्यासाठी अत्यावश्यक साधन आहे. मात्र रेशन दुकानात जाताना कार्ड घरी विसरल्यास किंवा नवीन कार्ड अजून मिळाले नसेल, तर चिंता वाटणं स्वाभाविक आहे.

आता या त्रासातून सुटका मिळणार आहे. भारत सरकारने रेशन कार्ड धारकांसाठी एक सोयीस्कर डिजिटल पर्याय उपलब्ध करून दिला आहे –"Mera Ration २.०' नावाचं अॅप. या अॅपच्या मदतीने वापरकर्ते मोबाईलवरच आपलं डिजिटल रेशन कार्ड पाहू शकतात आणि तेच रेशन दुकानदाराला दाखवून धान्य मिळवू शकतात.


**डिजिटल रेशन कार्ड कसे वापराल?**

१. सर्वप्रथम, तुमच्या स्मार्टफोनमध्ये 'Mera Ration 2.0' हे अॅप Google Play Store किंवा -pple -pp Store वरून डाउनलोड करा.
२. अॅप इन्स्टॉल झाल्यावर ते उघडा आणि तुमचा आधार क्रमांक प्रविष्ट करा.
३. नंतर "Login with OTP' वर क्लिक करा. आधार क्रमांकाशी लिंक असलेल्या मोबाईलवर आलेला जढ्झ टाका.
४. लॉगिन झाल्यावर तुमचं डिजिटल रेशन कार्डमोबाईल स्क्रीनवर दिसेल.
५. हे कार्ड दुकानदाराला दाखवून धान्य घेण्याची प्रक्रिया पूर्ण करा.

जर तुमच्याकडे अजून रेशन कार्ड नसेल आणि सरकारी कार्यालयांमध्ये चकरा मारायच्या टाळायच्या असतील, तर महाराष्ट्र सरकारच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या संकेतस्थळावर किंवा आपले सरकार पोर्टलवर जाऊन ऑनलाईन अर्ज करता येता

# विष्णुशास्त्री चिपळूणकर

'आधुनिक मराठी गद्याचे जनक' म्हणून ओळखले जाणारे श्रेष्ठ मराठी ग्रंथकार. त्यांच्या अगोदर आधुनिक मराठी गद्य जवळजवळ अर्ध्या शतकाहून अधिक काळ निर्माण होत होते, परंतु त्यांनी त्याला अधिक प्रभावी स्वरूप प्राप्त करून दिले. आज त्यांच्या जन्मदिनानिमित्त (२० मे १८५०) जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...



**निमित्त**

विष्णुशास्त्र्यांचा जन्म पुण्याचा. मुंबई विद्यापीठाची बी.ए.ची परीक्षा पुण्याच्या 'डेक्कन कॉलेजा'तून ते उत्तीर्ण झाले. त्यानंतर पुणे व रत्नागिरी येथील सरकारी माध्यमिक शाळांतून त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. विष्णुशास्त्र्यांचे वडील कृष्णशास्त्री हे संस्कृतज्ञ. इंग्रजी साहित्याचे जाणकार, रसिक, विद्वान आणि चतुरस्त्र मराठी लेखक असल्यामुळे विष्णुशास्त्र्यांनाही लेखनवाचनाची गोडी लागली. कृष्णशास्त्र्यांनी चालविलेल्या शालापत्रक ह्या मासिकातून विष्णुशास्त्र्यांच्या लेखनाचा आरंभ झाला व त्यानंतर काही वर्षांतच ते ह्या मासिकाचे संपादकही झाले. तथापि त्यांच्या संपादकीय कारकीर्दीत शालापत्रकातून सरकार व ख्रिस्ती मिशनरी ह्यांच्यावर त्यांनी केलेल्या खोचक टीकेचा गवगवा होऊन शालापत्रक बंद पडले. सरकारी नोकरीत असतानाच त्यांनी निबंधमाला, हे सुप्रसिद्ध मासिक काढले. तसेच ज. बा. मोडक आणि का. ना. साने ह्यांच्या सहकार्याने काव्येतिहाससंग्रह हे मासिक सुरू केले. आपल्या देशातील लोकांनी रचिलेली काव्ये, लिहिलेले इतिहास, बखरी असे साहित्य प्रसिद्ध करून त्यामार्गे देशसेवा करणे, हा हे मासिक काढण्यामागील हेतू होता. तथापि ह्या मासिकावर विष्णुशास्त्र्यांनी संपादक म्हणून आपले नाव घातले नव्हते. १८८० मध्ये नव्या पिढीच्या मनावर देशाभिमानाचे संस्कार करण्यासाठी टिळक-आगरकरांच्या सहकार्याने त्यांनी पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूल' ही ख्यातनाम शाळा स्थापन केली. त्याच वर्षी कडव्या राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारी दोन वृत्तपत्रे – केसरी हे मराठी आणि मराठा हे इंग्रजी-त्यांनी काढली. ह्यांशिवाय चित्रशाळा, आर्यभूषण छापखाना, किताबखाना ह्यांसारखे समाजशिक्षणोपयोगी उपक्रम त्यांनी सुरू केले. निबंधमाला हे विष्णुशास्त्र्यांचे प्रमुख जीवितकार्य. निबंधमालेच्या सात वर्षांच्या कारकीर्दीत निघालेल्या सर्वच्या सर्व म्हणजे ८४ अंकांतील लेखन विष्णुशास्त्र्यांनी जवळजवळ एकटाकी केले. लोकभ्रम, अनुकरण, गर्व ह्यांसारखे विषय त्यांच्या सामाजिक लेखनात आलेले आहेत. 'आमच्या देशाची स्थिती' आणि 'मुद्रणस्वातंत्र्य हे दोन लेख त्यांच्या राजकीय लेखनापैकी विशेष उल्लेखनीय होत.

स्वमताविषयी तारुण्यसुलभ अभिनिवेश आणि परमतखंडनातील धारदार उपहास-उपरोध, सुभाषितांचा मार्मिक उपयोग, पल्लेदार वाक्यरचना ही त्यांच्या शैलीची काही लक्षणीय वैशिष्ट्ये. ह्या लेखनाने मराठी गद्याला प्रौढता आणली अनेकांना राष्ट्रभक्तीची, इतिहाससंशोधनाची आणि साहित्यसेवेची प्रेरणा दिली. राजकीय वा सामाजिक चळवळीत ते प्रत्यक्ष पडले नाहीत आपला परंपराभिमानी राष्ट्रवाद जोपासण्याच्या भरात प्रार्थनासमाज, आर्यसमाज,सत्यशोधक समाज, आंग्लशिक्षित सुधारक मंडळी, ख्रिस्ती धर्मोपदेशक ह्यांना सरसकट परधार्जिणे ठरवून त्यांनी अनुदार टीका केली, पुणे येथे ते निधन २० मे १८५० पावले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# आंब्याच्या कोयीचेही आरोग्यदायी फायदे

उन्हाळ्याचा सीझन सुरू झाला की सर्वत्र बाजारपेठांमध्ये आंब्याचा घमघमाट पसलेला असतो. चवीला गोड तसेच रसाळ असणाऱ्या आंब्याला जगभरात प्रचंड मागणी आहे.



पण आंब्याचा गर खाऊन लोक त्याची कोय फेकून देतात. परंतु आंबाचे शरीराला जितके फायदे आहेत, तितकिच त्याची कोयही गुणकारी मानली जाते.

आंब्याच्या कोयमध्ये अनेक नैसर्गिक घटक आढळतात. व्हिटॅमिन, मिनिरल्स तसेच अँटि-ऑक्सिडंट्स गुणांनी परिपूर्ण असणारी आंब्याची कोय शरीरासाठी फायदेशीर आहे.

**केसांतील कोंडा कमी होतो-** केसांमधील कोंडा ही एक मोठी समस्या आहे. फक्त हिवाळ्यातच नाही तर उन्हाळ्यात देखील केसांमध्ये कोंडा होण्याची समस्या उद्भवू शकते.

आंब्याच्या कोयीपासून बनवलेलं पेस्ट केसातील कोंडा नाहिसा करण्यासाठी उपयुक्त ठरतं. हे पेस्ट केसांवर तसेच टाळूवर हळूवारपणे लावावं. त्यानंतर काही वेळानंतर केस पाण्याने धुवावे. हे पेस्ट केसांना लावल्यामुळे केस मऊ आणि चमकदार बनतात.

१) सुरुवातीला आंब्याच्या काही कोय एकत्र करून घ्या.
२) या कोयींच्या वरचा भाग पूर्णपणे काढून त्याच्या आतील पांढरी बी काढा.
३) या बिया मिक्समध्ये बारीक करून घ्याव्या.
४) हे मिश्रण रायच्या तेलामध्ये एकजीव करावं आणि ही पेस्ट केसांवर अप्लाय करावी.

**कोलेस्ट्रोल कंट्रोल होण्यास मदत –** आंब्याच्या कोयीमुळे शरीरातील बॅड कोलोस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते. आंब्याच्या कर्नेल पावडरचे सेवन केल्याने खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते आणि रक्तातील साखरेची पातळी देखील नियंत्रित राहते. या कोयीच्या पावडरपासून शरीरातील रक्ताभिसरण सुधारण्यास मदत होते, असं तज्ञ सांगतात. यासाठी आंब्याची कोय नीट वाळवून बारीक करून त्याची बारीक पावडर बनवा. एक ग्लास पाण्यात एक चम्मच पावडर मिसळून त्याचं सेवन करावं. त्यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते.

**वजन होईल कमी-** वजन कमी करण्यासाठी आंब्याची कोय उपयुक्त ठरते. यामुळे मेटाबॉलिक रेटमध्ये वाढ होऊन, पोटावरील चरबी कमी होते.

# मान्सूनची चाहूल; मच्छीमारांची लगबग

## समुद्रातील बोटींना किनाऱ्यावर सुरक्षित थांबा!

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील किनारपट्टीवर मान्सूनपूर्व सजीव हालचालींना सुरुवात झाली आहे. आकाशात जमलेले ढग, वातावरणातील दमटपणा आणि समुद्राच्या लाटांमधील बदल यांमधून मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागताच मच्छिमार बांधवांनी समुद्रातील बोटी सुरक्षितपणे किनाऱ्यावर आणण्याची गडबड सुरू केली आहे.



जीवना बंदर, मुळगाव कोळीवाडा, तक्क कोळीवाडा, भरटखोल, दिघी, आदगाव, दिवेआगर, कुडगाव आदी ठिकाणचे शेकडो मच्छिमार आपल्या बोटींना सुरक्षित ठिकाणी आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहेत. समुद्राच्या चंचल स्वभावाची जाणीव असलेल्या या अनुभवी मच्छिमारांना वातावरणातील लहानसाही बदल समजतो. कधी कधी हवामान खात्याचे अंदाज चुकू शकतात, पण या पारंपरिक ज्ञानाने परिपक्व झालेल्या मच्छिमारांचे अंदाज क्वचितच चुकतात.

या काळात शासनाने जाहीर केलेली मासेमारी बंदीही अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेली आहे. त्यामुळे बोटी किनाऱ्यावर आणण्याच्या या हालचालींना अधिक वेग आला आहे. समुद्रात वाढणाऱ्या वाऱ्याची तीव्रता, संभाव्य वादळांची शक्यता आणि लाटांच्या उंचीतील वाढ यामुळे समुद्रात थांबणे धोक्याचे ठरू शकते. ही काळजी लक्षात घेता प्रत्येक मच्छिमार आपली बोट, जाळी आणि अन्य साधनसामग्री वाचवण्यासाठी पुढे सरसावला आहे.

पूर्वी या काळात बोटी किनाऱ्यावर आणण्यासाठी संपूर्ण गाव एकत्र येत असे. एकमेकांना खांदा लावून, मोठ्या कष्टाने आणि सहकार्याने बोटी बाहेर काढल्या जात. ती परंपरा हळूहळू यंत्रसामुग्रीच्या वापरामुळे मागे पडत आहे. आज जेसीबी, ट्रॅक्टरसारख्या आधुनिक साधनांमुळे ही कामे जलद आणि कमी मनुष्यबळात पूर्ण केली जातात. त्यामुळे वेळ आणि श्रमाची बचत होते, पण त्या स्नेहबंधांचा आणि सामुदायिकतेच्या भावना काही अंशी रंध्रात जाते.

या काळात मच्छिमार आपल्या नौकांमधील मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या जाळ्यांचीही नीट स्वच्छता करत आहेत. समुद्रातील खाऱ्या पाण्यात धुतलेले जाळे उन्हात वाळवले जात आहे. ही प्रक्रिया जरी साधनांच्या देखभालीसाठी असली, तरी त्यामागे असतो एक सजीव भाव – मेहनतीचे, निसर्गाशी असलेल्या नात्याचे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे समृद्ध समुद्राशी असलेल्या सहजीवनाचे.

# विजेच्या धक्क्याने म्हशींचा मृत्यू

## चांधई येथील घटना; शेतकऱ्याचे नुकसान

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील चांधई येथे शेतामध्ये चारा खाण्यासाठी गेलेल्या तीन म्हशींना विजेच्या तारेचा धक्का बसल्याने त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून दुभत्या म्हशी यांचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्यावर आर्थिक संकट कोसळले आहे.



या प्रकरणी महावितरण कंपनीकडून शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळावी यासाठी संबंधित म्हशींच्या मृत्यूचे पंचनामे करण्यात आले असून ते सर्व पंचनामे वरिष्ठ कार्यालयाला पाठवले जातील. अशी माहिती महावितरण कडून देण्यात आली आहे. मागील काही दिवसांपासून अवकाळी पाऊस सुरू असून सतत सुरू राहिलेल्या अवकाळी पावसाने शेतकरी संकटात सापडला आहे. त्यात आता शेतामध्ये पडलेली विजेची वाहिका बाजूला करण्याची सूचना चांधई गावातील शेतकऱ्यांनी दिली होती. तरी देखील महावितरण कडून त्याबाबत निरुत्साह दाखवण्यात आला.

चांधई गावातील शेतकरी महेश बंडू थेर हे आपल्या दुभत्या म्हशी घेवून शेतजमिन असलेल्या ठिकाणी गेले होते. रविवारी संध्याकाळी म्हशी आणि गुरे शेतात बागडत असताना तेथील जमिनीकडे झुकलेल्या विजेच्या तारेचा धक्का म्हशींना लागला. आधी विजेच्या खांबावरील तार तुटल्याचे लक्षात आले नाही. पण जसे सर्व प्राणी विजेच्या धक्क्याने थरथरायला लागले तेव्हा शेतकरी महेश थेर यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून तेथे असलेल्या गुरांपैकी काही गुरांना वाचविण्याचां प्रयत्न केला. तरी देखील तीन म्हशींना विजेचा जोरदार धक्का बसल्याने त्यांचा जागीच तडफडून मृत्यू झाला.

याबाबत महावितरण कडून कडाव येथील सहायक अभियंता डांगी यांनी पंचनामे करून घेण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे. कडाव कार्यालयातून सर्व कागदपत्रे कर्जत उप विभागीय अधिकारी कार्यालयात पाठवण्यात आली असून कर्जत कार्यालयाकडून महावितरण कंपनी कडे प्रस्ताव सादर करण्यात येतील. असे आश्वासन महावितरणचे उप अभियंता चंद्रकांत केंद्रे यांनी शेतकऱ्यांना दिले आहे.

# माथेरान शटलसाठी ऑनलाईन आरक्षणाची मागणी

**माथेरान : बातमीदार**

माथेरान पर्यटनस्थळाची अस्मिता समजली जाणारी माथेरानची राणी अर्थात मिनिट्रेन शटल सेवा सुरळीत सुरू असून विकेंडला सर्व फेऱ्या पर्यटकांनी पूर्ण क्षमतेने भरून जात आहेत. पर्यटक संख्या जास्त आणि शटलच्या फेऱ्या कमी यामुळे मिनिट्रेनसाठी येणाऱ्या हौशी पर्यटकांना मिनीट्रेनचा आनंद घेता येत नसल्याने त्यांचा पुरता हिरमोड होत आहे.शटल सेवेचे आरक्षण असते तर आमची माथेरान सहल समाधानी झाली असती असे पर्यटकांचे म्हणणे असून आगामी काळात मिनिट्रेन शटल सेवेसाठी आरक्षण खिडकी सुरू करावी अशी मागणी पर्यटक प्रवाशांकडून येथे केली जात आहे.

मुंबई–पुण्यापासून अगदी जवळ असल्याने माथेरान पर्यटनस्थळाकडे पर्यटकांचा कल वाढू लागला आहे घामांच्या धारा पासून सुटका मिळावी म्हणून माथेरान सारख्या थंड हवेच्या ठिकाणी पर्यटकांची पावले वळू लागली आहेत. येथील अमन लॉज स्टेशन ते माथेरान स्टेशन दरम्यान शटल सेवेच्या अप व डाऊन मिळून दिवसातून सोळा फेऱ्या होत आहेत.

उन्हाळी पर्यटन हंगामात पर्यटक संख्या जास्तअसल्यामुळे काही पर्यटकांना तिकीट न मिळाल्यामुळे मिनीट्रेनचा आनंद घेता येत नसल्याने पर्यटक नाराजी व्यक्त करीत आहेत.

**माझ्या परिवारातील बच्चे कंपनीला मिनिट्रेनची सफर करायची होती.आम्ही सकाळीच माथेरान रांगेत उभे राहूनही आम्हाला तिकीट मिळाले नाही.बच्चेकंपनीचा पुरता हिरमोड झाला.माथेरान मिनिट्रेनचे आकर्षण लहान मुलांना जास्त असल्याने ते हट्ट धरून बसले पण नाईलाज झाल्याने आम्हाला माघारी फिरावे लागले.जर ऑनलाइन आरक्षण असते तर आम्ही ते आरक्षित करून मिनिट्रेनचा आनंद मुलांना नक्कीच दिला असता.मध्य रेल्वेने शटल सेवेची ऑनलाइन आरक्षण सेवा सुरू करावी**
**–प्रशांत महाजन, पर्यटक, कल्याण**

## कारची काच फोडून चोरी

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

खालापूर पोलीस ठाणे हद्दीत रविवार (दि.१८) रोजी १४:३० वा च्या सुमारास मौजे चौक येथे शिवाय हॉटेलचे पार्कींग मध्ये फिर्यादी यांनी त्याची कार मोकळया जागेत पार्क करुन जेवण करायला गेले होते. त्या दरम्यान अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे कारचे डावे बाजुकडील मागील दरवाजाच्या खिडकीची काच फोडुनी निळया रंगाची बॅग व त्यामधील एकुण ११,०००/– रुपये व चिजवस्तु चोरी केली याबाबत खालापूर पोलीस ठाणेप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.असून अधिक तपास पोहवा/सोनावणे हे करीत आहेत.

## जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष सुरू

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्हास्तरीय कक्षा मार्फत अनेक दुर्धर व गंभीर स्वरुपाच्या आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना संबधीत रुग्णालयामार्फत आर्थिक सहाय्य देण्यात येते. आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. नागरिकांना या सेवा सहजपणे जिल्हास्तरावर उपलब्ध व्हाव्यात यासाठी रायगड जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष संपर्क व व्हॉट्सअ‍ॅप हेल्पलाईन क्र. ८२६५०००७८९ सुरु करण्यात आला असून या क्रमांकाच्या माध्यमातून जिल्ह्यातील गरजू रुग्ण/लाभार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी केले आहे.

कक्षाचा ई–मेल आयडी cmrfraigad@gmail.com हा आहे. जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष मा.मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग–रायगड येथे जिल्हास्तरीय कक्ष सुरु करण्यात आलेला आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे – हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्स नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| चंद्रकांत एकनाथ बडेकर | ११ | ६ | ०–१७–० | ० | ५६ |

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक :– २०/०५/२०२५

**सही /–**
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**

**कार्यालयीन पत्ता :–** मु.पो. कशेळे, कर्जत–मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
मो.नं. ९१५८२७७७२८



### PUBLIC NOTICE

The general public is hereby informed that myself Mrs. Priyanka Nilesh Patil along with Mr. Nilesh Ramdas Patil, is intending to purchase the below mentioned schedule property from its owner viz. Mrs. Meena Virendra Kumar Agarwal, having office at Done Villege, Karjat Taluka, District- Raigad, Maharashtra- 410201.

If anybody is having any objection, claim, interest, dispute, for the above intended sale transaction, he / she / they may contact the undersigned with the documentary proof substantiating his/her/ their objection / claims / details of the dispute / s within seven (07) Seven days, from the date of publication of this notice, falling which, we will proceed to complete with the sale transaction with the above owners as there are no third party claims / objections / disputes in respect of the schedule property and thereafter no claims / objections / disputes will be entertained.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

All that the property i.e. Survey No. 13, Hissa No. 1, admeasuring 58.50 H. R. S. Mtr. Out of 1.18.58 H. R. S. Mtr., situated at Done, Taluka- Karjat, District- Raigad, Pin code- 410201, belongs to its owner Mrs. Meena Virendra Kumar Agarwal.

Date : 19/05/2025

**Sd/-**
**Adv. Priyanka N. Patil.**
Advocate High Court.

**Office Address :** Shraddha Sneh Apt, B-101, opp. To Jakat Naka, Panvel- Uran Road, Koliwada, Panvel- 410206.
Email : aswalepriyanka30@gmail.com
Contact No. 9867042996 / 9619965851.



### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५–२६ ते २०२९–३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम आज दि. २०/०५/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव : **ओंकारपुरम को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी मर्यादित आदई, ता. पनवेल, जि. रायगड.** सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. २१/०५/२०२५ ते २६/०५/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक २७/०५/२०२५, नामनिर्देशन माघारी दि. २९/०५/२०२५ ते १२/०६/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान दि. २२/०६/२०२५ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात, निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय, **संस्था कार्यालाय :– ओंकारपुरम को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी मर्यादित आदई, ता. पनवेल, जि. रायगड.** कार्यालयात पाहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी यांची नोंद घ्यावी.

**सही/–**
**संदेश नंदकुमार महाडीक**
निवडणूक निर्णय अधिकारी

प्राधिकृत अधिकारी, कोकण विभाग पॅनल अ.क्र. वर्ग 'क' ०६/ 'ई' ०९. ओंकारपुरम को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी मर्यादित आदई, ता. पनवेल, जि. रायगड



ॲड. सुरेश एम. निंबाळकर

### जाहीर नोटीस

**जळगांव येथील मे ५ वे सह दिवाणी न्यायाधिश व. स्तर सो. यांचे न्यायालयात**

दि. कि. अर्ज ३११/२०२५
निशाणी ०८
चौकशी. ता. २६/०६/२०२५

गौरी पंकज सनान्से, वय ४५,
धंदा घरकाम,
२. नेहा पंकज सनान्से, वय–२१. ................. **अर्जदार**
धंदा–शिक्षण,
३. मंदार पंकज सनान्से, वय १९,
सर्व रा. प्लॉट नंबर १८, पारस बिल्डींग,
श्रध्दा कॉलनी, गोदावरी चक्की जवळ,
जळगाव ता. जि. जळगांव

**विरुध्द**

कोणीही नाही .................. **सामनेवाले**

अर्ज – बॉम्बे रेग्युलेशन VIII of 1828 चे कलम २ व ३ प्रमाणे.....

**जाहीर** नोटीस देण्यात येते कि, अर्जदार हे सरनाम्यात वर दिलेल्या पत्त्यावर राहत असून अर्जदारांशिवाय मयतास कोणीही कायदेशीर वारस नाहीत **मयत पंकज गिरधर सनान्से** या दि.१८/१२/२०२४ रोजी श्रध्दा कॉलनी, जळगांव येथे मयत झाले आहेत. अर्जदार १ ते ३ हेच मयताचे कायदेशिर वारस आहेत.

मयत **मयत पंकज गिरधर सनान्से** हे भूकरमापक या पदावर खालापूर, जि. रायगड येथे कार्यरत होते. मयत पंकज गिरधर सनान्से हे दिनांक १८/१२/२०२४ रोजी मयत झाले. त्यानंतर अर्जदार नं. १ व ३ यांना उसर्ली खुर्द, तालुका पनवेल जि. रायगड येथील पंचवटी रिव्हरसाईड को–ऑप. हौसिंग सोसायटी लि. मधील फ्लॅट नंबर ४०६, चौथा मजला, ए विंग, बिल्डींग नंबर २ या मिळकतीस नाव लावण्याकरीता वारस दाखल्याची आवश्यकता आहे. मयताचे मृत्युपश्चात वारस असल्याबाबत दाखला मिळणेसाठी अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. मयत पंकज गिरधर सनान्से यांची आई सुरेखा गिरधर सनान्से तसेच मयताचे वडील गिरधर बंडू सनान्से यांचासुध्दा मृत्यू झोलेला असून ते आज हयात नाहीत.

सदर अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात आणि उक्त लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरील अर्जदारांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबित झाल्यास सदर अर्जदार यांना **मयत पंकज गिरधर सनान्से** यांचा वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक १७/०५/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

हुकूमावरुप

**सही/–**
क. लिपीक
दिवाणी न्यायालय व स्तर जळगांव

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर जळगांव



सिडको
शहरांचे शिल्पकार

### नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत प्रमाणपत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व १) श्री. रतन जगन्नाथ भगत २) श्री. अनिल पांडुरंग भगत ३) श्री. श्रीधर काशिनाथ भगत, राहणार – शेलघर, ता. पनवेल, जि. रायगड– ४१० २०६ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. गणेश इंटरप्रायझेस तर्फे भागीदार १) नितीन बाबुभाई गाजीपारा २) प्रशांत बाबुभाई गाजीपारा ३) मे. शांतम स्टॉक ट्रेडिंग प्रा. लि. चे डायरेक्टर श्री. प्रशांत बाबुभाई गाजीपारा** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी''मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २३५९ | २९.०४.२०२५ | पुष्पक नोड | २६ | १४६ | ४२२० चौ. मी. पैकी २११० चौ. मी. (५०% क्षेत्र अविभाज्य भाग) | १८.०२.२०२५ | ०४.०३.२०२५<br>१०.०३.२०२५ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०८२/२०२५-२६



**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६

### थेट मुलाखत (Walk in Interview)

पनवेल महानगरपालिकेमध्ये विवक्षित कामकाजाकरीता खालील नमुद केल्याप्रमाणे शासकीय / निमशासकीय कार्यालय / सिडकोकडील, तसेच नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिकेच्या सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात प्रथम सहा महिन्यांकरीता करार पद्धतीने खालील अटी व शर्ती नुसार सेवा प्राप्त करुन घेण्यासाठी दि. २७/०५/२०२५ रोजी थेट मुलाखत (Walk in Interview) आयोजित केली आहे. इच्छुक उमेदवारांनी दि.२७/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके, नाट्यगृह, पनवेल येथे आपली मूळ कागदपत्रे, सेवा निवृत्तीचे प्रमाणपत्र, अंतिम वेतन प्रमाणपत्र, ना विभागीय चौकशी, प्रमाणपत्र व अनुषंगिक कागदपत्रे घेऊन स्वत: हजर राहावे. सविस्तर जाहिरात महापालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| पदाचा संवर्ग | अनुभव | मानधन |
|---|---|---|
| सेवानिवृत्त लेखाधिकारी/ सहाय्यक लेखाधिकारी (पद संख्या ०१) | शासकीय/निमशासकीय/सिडको/ नगर परिषद /न.पा/ म.न.पा.मध्ये सेवेत असताना किमान ५ वर्षे लेखा विभाग/लेखा परिक्षण विभाग | म. शा. सा. प्र. वि. शासन निर्णय क्र. संकीर्ण–२७१५ /प्र.क्र. १००/१३ दि. १७/१२/१६ आणि दि. ८/९/२०२३ नुसार निश्चित केलेले मानधन. |

**अटी व शर्ती :–**

१) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.
२) नियुक्तीसाठी सक्षम असलेल्या प्राधिकरणाने विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा कर्मचाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.
३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.
४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.
५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींस प्राप्त होणाऱ्या अधिकारांतर्गत येणारे आवश्यक दस्तऐवज/कागदपत्रे माहिती व आधार सामुग्री याबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींने त्यांच्यावर सोपविलेले कामकाज, निश्चित केलेल्या विहित कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.
७) सदरची सेवा ही फक्त ३ वर्षाच्या मर्यादेकरिताच राहणार आहे. तथापी १ वर्षाच्या कालावधीत त्यांचे कामाचे मूल्यमापन करुन पुढे सदरची सेवा सुरु ठेवणे किंवा नाही, याबाबत महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.
८) यापूर्वी करण्यात आलेल्या सेवा कालावधीचा तपशील तसेच विभागीय चौकशी, फौजदारी गुन्हा याबाबतची माहिती सदरच्या मुलाखती वेळी सादर करणे बंधनकारक राहील.
९) सदरच्या मुलाखती वेळी सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांसोबत स्व–घोषणापत्र भरुन देणे बंधनकारक राहील.
१०) पनवेल महानगरपालिकेस आवश्यक तितकेच अधिकारी/कर्मचारी घेण्यात येतील.

**सही/–**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
पनवेल महानगरपालिका

दिनांक : १९/०५/२०२५
जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.२०६/२०९/२०२५

## निवडक

### नोकरीच्या बहाण्याने फसवणूक

**नवी मुंबई :** शिपिंगमध्ये नोकरीला लावण्याचे आमिष दाखवून अनेकांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. यात १६ लाख ८० हजारांची फसवणूक झाली असून त्यात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एपीएमसी आवारातील सत्रात प्लाझा येथे अव्हेन्यू मरिन प्लेसमेंट व अधीर शिपिंग नावाने कंपनी सुरू करून हा प्रकार केला आहे. त्याठिकाणी तरुणांना शिपिंगमध्ये नोकरीला लावले जाईल, अशी जाहिरात केली होती. तिला भुलून इच्छुक तरुणांनी १ ते २ लाख भरले होते. पैसे घेतल्यानंतर त्यांना कामावर न लावता पैसे घेऊन संबंधितांनी पोबारा केला. हा प्रकार लक्षात येताच फसवणूक झालेल्यांनी पोलिसांकडे तक्रार केली आहे. त्यावरून एपीएमसी पोलीस ठाण्यात गणेश तालापल्ली, अमोल भोर व इतर दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

### नरेश म्हात्रे एससीओपदी नियुक्त



**उरण :** तालुका भाजपचे तालुका चिटणीस नरेश नामदेव म्हात्रे यांची महाराष्ट्र शासनाने विशेष कार्यकारी अधिकारीपदी (एससीओ) नियुक्ती करून नरेश म्हात्रे यांचा एका अर्थाने सन्मानच केला आहे. आमदार महेश बालदी, भाजप उरण तालुका माजी अध्यक्ष रवी भोईर, माजी नगरसेवक कौशिक शाह, उरण तालुका भाजप सरचिटणीस सुनील पाटील व भाजप कार्यकर्त्यांनी नरेश म्हात्रे यांचे अभिनंदन केले आहे. नरेश म्हात्रे यांचे समाजपयोगी कामे केली आहेत. नरेश म्हात्रे हे बीपीसीएल कंपनीतून सेवा निवृत्त झाले असून महाराष्ट्र शासनाने त्यांचा गुणवंत कामगार पुरस्कार देऊन गौरव केला आहे.

### वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

**मोहोपाडा :** वावर्ले चौक येथील कानसा वारणा फाउंडेशनचे राष्ट्रीय युवा अध्यक्ष रामदास दिपक पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ओम अबोदे येथील आश्रमाला भेट देवून तेथील मतिमंद मुलांना अन्नदान करण्यात आले. या आश्रमातील समस्या जाणून घेत कानसा वारणा फाउंडेशनच्यावतीने सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन रामदास पाटील यांनी तेथील संस्थाचालकांना दिले. तसेच परिसरातील आदीवासी व गोरगरीब बांधवांना किराणा सामानाचे किट वाटप करण्यात आले.

# बेलापूर रेल्वेस्थानकाबाहेर बेकायदेशीर पार्किंग

## स्थानिक नागरिक संतप्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूर रेल्वे स्थानका बाहेरून आग्रोली व शहाबाज गावात ये-जा करण्यासाठी बनविण्यात आलेल्या पायवाटेच्या रस्त्यावर दुचाकी वाहन चालकांनी पार्किंग सूरू केली आहे. या बेकायदा वाहन पार्किंग मुळे नागरिकांना ये जा करताना तारेवरची कसरत करावी लागत असून स्थानिक नागरिक संतप्त आहेत.

नवी शहरातील सिडको व महापालिकेच्या वाहनतळांवर ठरवून दिलेला शुल्क चुकविण्यासाठी वाहन चालकांनी आता रेल्वे स्थानकाबाहेरील मोकळ्या जागेत चोरी छुपे वाहन पार्किंग करण्यात सुरुवात केली आहे.

आग्रोळी व शहाबाज गावातील नागरिकांना ये-जा करण्यासाठी रिक्षा किंवा रेल्वे रूळ ओलाडून जावे लागत होते. त्यात अनेक अपघाताच्या घटना देखील घडल्या आहेत. त्यामुळे माजी नगरसेविका सरोज पाटील यांनी याबाबत सिडकोकडे पाठपुरावा करून बेलापूर रेल्वे स्थानका बाहेरून पायवाटेचा रस्ता बनविण्यास सिडकोस भाग पाडले, मात्र नागरिकांसाठी असणाऱ्या या रस्त्यावर आतां वाहनाचीच जास्त भाऊगर्दी पाहायला मिळत आहे.



> सार्वजनिक ठिकाणी अथवा नो पार्किंग ठिकाणी वाहन उभे केल्यास नवी मुंबई पोलिसांकडून वेळोवेळी कारवाई केली जाते. या ठिकाणी कारवाई करण्याचे आदेश त्वरित देतो.
> **–तिरुपती काकडे, नवी मुंबई पोलीस, उपायुक्त, वाहतूक विभाग**

सिडकोने शहरातील प्रत्येक रेल्वे स्थानका बाहेर वाहनतळांमध्ये दुचाकी व चारचाकींसाठी ठराविक रक्कम निश्चित केली आहे, मात्र बहुतांश वाहन चालकांना रोज नवी मुंबई बाहेरचा प्रवास रेल्वेने करावा लागत असल्याने रोज-रोज वाहन पार्किंगसाठी पैसे खर्च करणे परवडत नसल्याने अशा वाहनधारकांकडून स्थानका बाहेर दिसेल त्या जागी गाड्या पार्क केल्या जात आहेत. हा प्रकार सध्या बेलापूर स्थानका बाहेर पाहायला मिळत असून यामुळे स्थानिक रहिवाशी संतप्त आहेत.

हा रस्ता नागरिकांसाठी ये-जा करण्याकरिता बनविण्यात आला आहे. हा रस्ता आग्रोळी व शहाबाज गावातील नागरिकांसाठी अगदी सोयीस्कर असल्याने कायम ह्या रस्त्यावर नागरिकांची ये-जा सुरूच असते, मात्र काही वाहन चालकांनी अक्कल हुशारीने वाहन पार्किंगचे पैसे वाचविण्यासाठी या मार्गावर दुचाकीची पार्किंग केली आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून गव्हाणच्या दिक्षा वर्तकचे अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दहावीमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये ९८.६० % एवढ्या विक्रमी गुणांनी प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल कु. दिक्षा द्रौपदी रमेश वर्तक हिचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व थोर देणगीदार लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांनी हार्दिक अभिनंदन केले.

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये शनिवारी (दि.१७) दिक्षा वर्तक हिने तिच्या पालकांसमवेत लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेवून शुभाशिर्वाद घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिक्षा वर्तक हिचे पुष्पगुच्छ देवून व मिठाई भरून अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी दिक्षा वर्तक हिचे पालक रमेश वर्तक व गव्हाण विद्यालयाच्या उपशिक्षिका द्रौपदी वर्तक तसेच रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर व उपशिक्षक सागर रंधवे, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गवशेठ ठाकूर व श्री.घरत आदी उपस्थित होते.

## रेल्वेत नोकरीचे आमिष दाखवून फसवणारा भामटा अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

रेल्वेमध्ये सरकारी नोकरीत लावतो असे सांगून इच्छुक व्यक्तीसह त्याच्या आईची फसवणूक करून नोकरीचे आमिष दाखवून जवळपास १९ लाख ४२ हजार रुपये वेगवेगळ्या कारणाने उकाळणार्या एका सराईत भामट्यास अखेरीस पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले असून यापूर्वीसुद्धा त्याने अशाच प्रकारे कित्येक लोकांना फसविल्याचे अधिक तपासात निष्पन्न झाले आहे.

पनवेल शहरात राहणाऱ्या व्यक्तीला फेसबुकवर नोकरी शोधत असताना फेसबुक जॉब अड्डा येथे रेल्वेत नोकरी लावून देण्याची जाहिरात बघितली. त्यानुसार त्याने आरोपी अक्षय कलंगुटकर याच्याशी संपर्क साधला. त्याने रेल्वेत नोकरीला लावण्याचे आमिष दाखवून त्याकरिता मेडीकलसाठी टॅक्सचा फॉर्म भरण्याकरिता फॅमिली डिक्लेरेशन, नॅशनल पेन्शन कर्ता तसेच विविध कारणे दाखवून त्याला तसेच त्याच्या आईकडून त्याचप्रमाणे स्वतःच खोटा बॉस उभा करून त्याने या दोघांकडून विविध कारणे दाखवून आतापर्यंत १९ लाख ४२ हजार रुपये त्यांच्याकडून उकळले.

आपली फसगत झाल्याचे लक्षात येताच सदर व्यक्तीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला असता तो सीबीडी येथील एका ढाब्यावर दारु पित असल्याचे निष्पन्न झाल्याने या पथकाने त्याला तेथून ताब्यात घेतले.

तपासात त्याने अशाच प्रकारे नेरुळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका व्यक्तीला १७ लाखाला तर रबाळे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका व्यक्तीला ७५ लाखाला फसवणूक केल्याचे व याबद्दल त्याला अटक झाल्याने तो नुकताच जेलमधून सुटला असताना त्याने अशा प्रकारे पुन्हा एकदा जाहिरात देवून या दोघांची फसवणूक केली होती, परंतु पनवेल शहर पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा आरोपी अखेरीस गजाआड झाला आहे. त्याच्या खात्यात जमा होणारे पैसे हे तो नेहमी दारु, बिंगो व जुगारात उडवत असे. याबाबत पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अभय कदम करीत आहेत.



**पनवेल :** सुधाकर पाटील यांची कराडी समाज कामोठे हॉलच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्याबद्दल माजी नगरसेवक दिलीप पाटील यांच्याकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी हसुराम भगत, धाया गोवारी, रमेश गोवारी, बाळकृष्ण गोवारी, गणेश गोवारी, आदी उपस्थित होते.

## क्रियाशील प्रेस क्लबच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी सय्यद अकबर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रियाशील प्रेस क्लब संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (दि. १७) संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजय कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या वेळी झालेल्या सभेमध्ये नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली असून यामध्ये कोकण डायरी वृत्तसमूहाचे संपादक तथा भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांची अध्यक्षपदी तर सचिवपदी साबीर शेख यांची निवड करण्यात आली.



यामध्ये खजिनदारपदी चंद्रकांत शिर्के तर कार्याध्यक्षपदी राज भंडारी यांची निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्ष म्हणून संतोष वाव्हळ, प्रदीप ठाकरे आणि अनिल राय यांची तर सदस्यपदी विशाल सावंत, भूषण साळुंखे यांची निवड करण्यात आली.

## पोलिसांना २३ वर्षे गुंगारा देणारा जाळ्यात

**नवी मुंबई : बातमीदार**

मारहाणीच्या गुन्ह्यात जामिनावर सुटल्यानंतर सुनावणीला हजर न राहता फरार झालेल्या गुन्हेगाराला नेरूळ पोलिसांनी २३ वर्षांनी अटक केली आहे. तो तुर्भे येथील रेल्वे यार्डच्या सिमेंट गोदामामध्ये काम करत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने तेथे जाऊन त्याला अटक केली. अरुणकुमार उपाध्याय (वय ४२), असे पोलिसांनी केलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे.

अटक उपाध्याय व त्याच्या इतर तीन साथीदारांवर २००२ मध्ये मारहाणीचा गुन्हा दाखल आहे. शिरवणे एमआयडीसीमध्ये त्यांनी एका कंपनीच्या मॅनेजरला जबर मारहाण केल्याप्रकरणी तो अटकेत होता. तुर्भे रेल्वे यार्ड येथील सिमेंट गोदामात आरोपी काम करत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी कारवाई केली. उपाध्याय हा जामिनावर सुटला होता; मात्र जामिनावर सुटल्यानंतर तो खटल्याच्या सुनावणीला न्यायालयात हजर राहत नव्हता. यामुळे पोलिसांनी त्याचा शोध घेऊनही तो मिळून येत नव्हता. अखेर न्यायालयाने त्याला फरार घोषित करून त्याच्यावर अजामीनपात्र अटक वॉरंट काढला होता.

## पवई तलावाला हायसिंथचा धोका

### स्थानिकांसह नवी मुंबईतून सुरू झाली मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

हायसिंथ वनस्पतींनी भरलेल्या पवई तलावाच्या स्वच्छतेसाठी अधिकाऱ्यांच्या सततच्या निष्क्रियतेमुळे नाराज झालेल्या स्थानिक रहिवासी आणि पर्यावरणवाद्यांनी जलस्रोत आणि त्याची जैवविविधता वाचवण्यासाठी मोहिमांची मालिका सुरू केली आहे.

सेव पवई लेक या बॅनरखाली, कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ईमेल पाठवून हस्तक्षेप करून नागरी अधिकाऱ्यांना आक्रमक जलसंयंत्रे साफ करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती केली आहे. आम्ही बऱ्याच काळापासून नागरी अधिकाऱ्यांकडे विनंती करत आहोत, पण कोणतीही कारवाई होत नाही, असे पवईतील जलवायू विहार येथील रहिवासी पामेला चीमा यांनी दुःख व्यक्त केले. या आंदोलनात नवी मुंबईच्या पर्यावरण संघटनादेखील सहभागी झाल्या आहेत.



जलसंपत्तीच्या वाढीवर नियंत्रण नसल्याने तलावात कोणत्याही गटारांच्या पाईप्स उघडत आहेत का ते अधिकाऱ्यांनी तपासावे असे पर्यावरण संघटनांचे म्हणणे आहे. हायसिंथचा जैवविविधतेवर प्रतिकूल परिणाम होतो आणि तो तलावातील सूर्यकिरणांना अडथळा आणतो, असे नवी मुंबईतील पर्यावरण संघटना असलेल्या नॅटकनेक्टचे संचालक बी.एन. कुमार यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या ईमेलमध्ये निदर्शनास आणून दिले आहे.

पवई हे मगरी आणि इतर अनेक जलचरांचे घर आहे. एकेकाळी सुंदर, विस्तीर्ण पाणथळ जागा असलेले पवई तलाव सध्या दयनीय अवस्थेत आहे. मुख्य रस्त्यावरून गाडी चालवणाऱ्या कोणालाही ही अवस्था पाहता येते, असे कुमार म्हणाले. त्यांनी आश्चर्य व्यक्त केले की या तलावाकडे कोणत्याही अधिकाऱ्यांचे, मंत्र्यांचे किंवा निवडून आलेल्या प्रतिनिधींचे लक्ष नसल्याचे त्यांनी नमूद केले. तलावाचे सौंदर्यीकरण करण्याचे आश्वासन दिले गेले होते मात्र ते फक्त कागदावरच राहिलेअसे कुमार म्हणाले. चित्रे हजार शब्दांपेक्षा जास्त बोलतात, असे शब्बीर तांबावाला म्हणाले, त्यांनी तलावाची भयानक स्थिती दर्शविणारी छायाचित्रे सादर केली आहेत. कार्यकर्त्यांनी हे फोटो मुख्यमंत्र्यांना पाठवले, पालिका आयुक्तांना मेल देखील केले आणि त्याचबरोबर त्यांनी ऑनलाईन याचिकाही दाखल केली आहे. हिरानंदानी गार्डन्सचे रहिवासी मिलन भट यांनी या विषयक समाज माध्यमांवर मोहीम सुरू केली असून, त्यास उदंड प्रतिसाद मिळत आहे.

जलवायू विहारच्या गीतांजली धुळेकर म्हणाल्या की, पवईच्या जैवविविधतेचे रक्षण करण्यासाठी जागरूकता पसरविण्यासाठी आणि पाठिंबा मिळवण्यासाठी रहिवाशांनी स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. त्या स्वाक्षऱ्या मंत्र्यांपर्यंत पोहचवून पवई तलावांचे आंदोलन तीव्र केले जाणार असल्याचे धुळेकर यांनी सांगितले.

## सुधाकरदास महाराज यांचा सत्कार; मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुधाकरदास महाराज यांचा सत्कार हा केवळ एका व्यक्तीचा सत्कार नसून तो संपूर्ण पनवेलचा सत्कार आहे, असे गौरवोद्गार माजी खासदार संजीव नाईक यांनी महंत सुधाकरदास महाराज यांच्या सत्कार सोहळ्यावेळी काढले.

सुधाकरदास महाराज यांचा श्री गुरु अभिनंदन सत्कार सोहळा शुक्रवारी पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव फडके नाट्यगृहात मोठ्या उत्साहात झाला. या सोहळ्याला माजी खासदार संजीव नाईक, आमदार विक्रांत पाटील आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून सुधाकरदास महाराज यांना शुभेच्छा दिल्या.



या वेळी महंत काशिनाथ महाराज, श्री गुरु खाशाबादास महाराज, महामंडळेश्वर डॉ. रामनगिरी महाराज, महंत श्रीकांत महाराज आणि स्वामी देवांत महाराज यांच्यासह भाजप नेते सुनील घरत, माजी नगरसेवक हरेश केणी, गणेश कडू, माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज, संजय पाटील, तानाजी भोसले यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन अवधूत सुधाकर घरत आणि स्वामी समर्थ भक्त मंडळ, पनवेल यांच्या वतीने करण्यात आले होते.



**नवी मुंबई : बेलापूर सहकारी ग्राहक संस्था मर्यादित या संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत जय श्री राम पॅनलचा धुव्वा उडवत आमदार मंदा म्हात्रे यांचे जय गणेश पॅनल बहुमतांनी निवडून आले. ६३ वर्षापूर्वी बेलापूर गांव परिसरातील नागरिकांनी एकत्र येऊन बेलापूर सहकारी ग्राहक संस्थेची स्थापना केली होती. विजयी सभासद सर्वश्री रूपेश दिवेकर, भालचंद्र म्हात्रे, निलेश म्हात्रे, स्वप्नील म्हात्रे, मोहन मुकादम, दिनानाथ पाटील, प्रकाश पाटील, प्रसाद तांडेल, रतन तांडेल, प्रतिभा म्हात्रे, ज्योती पाटील, विश्वास भोईर, जनार्धन भोईर आणि अमेय मुकादम यांचे अभिनंदन करण्यात आले.**

# गुजरातचा दिल्लीवर विक्रमी विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५ स्पर्धेत शुबमन गिल आणि साई सुदर्शनच्या जोडीचा बोलबाला पहायला मिळाला आहे. दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध झालेल्या सामन्यातही या जोडीने दमदार विजयी भागिदारी रचली. दिल्लीने गुजरात टायटन्ससमोर विजयासाठी २०० धावांचे आव्हान ठेवले होते. गुजरातच्या सलामी जोडीने एकही विकेट न गमावता या धावांचा यशस्वी पाठलाग केला. यामध्ये साई सुदर्शनने शानदार शतकी खेळी केली.

दोन्ही संघांसाठी हा सामना अतिशय महत्त्वाचा होता. त्यामुळे इतका मोठ्या धावांचा डोंगर सर करण्याचा दबाव गुजरात टायटन्स संघावर होता, परंतु गिल आणि सुदर्शन या दोघांची फलंदाजी पाहून दबाव असल्याचे मुळीच दिसून आले नाही. दोघांनी दिल्लीच्या गोलंदाजांचा समाचार घेतला.





साई सुदर्शन याने ६१ चेंडूत १२ चौकार आणि चार षटाकारांच्या मदतीने नाबाद १०८ धावांची खेळी केली. दुसऱ्या बाजूला शुबमन गिल ५३ चेंडूत तीन चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ९३ धावांवर नाबाद राहिला. या दोघांनीच गुजरात संघाला विजय मिळवून दिला.

तत्पूर्वी दिल्लीने पहिल्या डावात फलंदाजी करताना १९९ धावा केल्या होत्या. या सामन्यात दिल्लीचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी मैदानात आला. दिल्लीकडून केएल राहुलची बॅट चांगलीच तळपली. त्याने ६५ चेंडूंचा सामना करीत ११२ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने चार षटकार आणि १४ चौकार मारले, तर अभिषेक पोरेलने ३० धावा चोपल्या. शेवटी अक्षर पटेलने २५ आणि ट्रिस्टन स्टब्सने २१ धावा करत संघाची धावसंख्या १९९वर पोहचवली.

## गुजरातच्या विजयासह तीन संघ ठरले प्लेऑफसाठी पात्र

**मुंबई : प्रतिनिधी**

साई सुदर्शन आणि शुबमन गिलच्या द्विशतकी भागीदारीच्या जोरावर गुजरात टायटन्सने दिल्लीचा एकतर्फी पराभव केला. या विजयासह गुजरातचा संघ आयपीएल २०२५च्या प्लेऑफसाठी पात्र ठरला. त्याचबरोबर गुजरातने आपल्यासह इतर दोन संघांनाही प्लेऑफमध्ये नेले आहे.

गुजरात टायटन्स संघ या विजयासाठी पहिल्या स्थानी पोहचला आहे, तर दुसऱ्या स्थानी आरसीबीचा संघ आणि तिसऱ्या स्थानी पंजाब किंग्सचा संघ आहे. यासह हे तिन्ही संघ प्लेऑफसाठी क्वालिफाय ठरले आहेत. यासह चौथ्या स्थानासाठी मुंबई इंडियन्स, दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपर जायंट्स संघासाठी अटीतटीची लढत होणार आहे. त्यामुळे या तिन्ही संघांचा प्रत्येक सामना महत्त्वाचा असणार आहे.

## रायगडच्या तेजा सकपाळ, समीर हिरवे यांची महाराष्ट्र बीच कबड्डी संघात निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

गुजरातमधील दिव येथे होणाऱ्या खेलो इंडिया बीच गेम्ससाठी महाराष्ट्राचे पुरुष व महिला कबड्डी संघ जाहीर करण्यात आले आहेत. महाराष्ट्राच्या पुरुष संघात रायगडचा समीर हिरवे याची, तर महिला संघात रायगडची तेजा सपकाळ हिची निवड झाली आहे.

केंद्र सरकारच्या मान्यतेने खेलो इंडिया बीच गेम्सचे गुजरातमधील दिव येथे आयोजन करण्यात आले आहे. या बीच गेम्समध्ये बीच कबड्डीचा समावेश करण्यात आला आहे. बीच कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे पुरुष व महिला संघ निवडण्याकरिता अलिबाग तालुक्यातील वरसोली येथे





सराव शिबीर व निवड चाचणी घेण्यात आली. यातून महाराष्ट्राचे संघ निवडण्यात आले.

रायगडचा समीर हिरवे याची पुरुष संघात निवड करण्यात आली. तेजा सकपाळ हिची महाराष्ट्राच्या महिला संघात निवड करण्यात आली. समीर हा अलिबाग तालुक्यातील धेरंड येथील जय हनुमान संघाचा खेळाडू आहे, तर तेजा ही कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल संघातून खेळते.

## सभागृह नेते चषक नेते स्पर्धा रंगली

### रिषभ शिवांश ११ पनवेल संघ विजेता



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष व युवा मोर्चा कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त १७ व १८ मे रोजी कळंबोलीत भव्य अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत रिषभ शिवांश ११ पनवेल संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धा रोडपाली येथील नवीन बस डेपोजवळील मैदानावर दिवस-रात्र खेळली गेली. स्थानिक क्रिकेटप्रेमींसाठी ती पर्वणी ठरली. स्पर्धेला माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी त्यांचे अभीष्टचिंतन करण्यात आले.

स्पर्धेत प्रथम पारितोषिक २१ हजार १११ रुपये व भव्य चषक, द्वितीय क्रमांकाला ११ हजार १११, तर तृतीय व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी पाच हजार ५५५ रुपये व चषक होते. द्वितीय क्रमांक श्रीयान ११ रोडपाली संघ, तृतीय क्रमांक सचिन ११ खांदा कॉलनी, चतुर्थ क्रमांक ओमप्रकाश स्मृती ११ कळंबोली संघाने मिळवला. सर्व संघांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेमुळे परिसरातील युवकांना खेळातील कौशल्य दाखवण्याची उत्तम संधी उपलब्ध झाली.

## मुस्तफिजूर रहमानच्या व्यावसायिक निष्ठेचे कौतुक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीतल्या अरुण जेटली स्टेडियमवर रविवारी रात्री दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध गुजरात टायटन्स असा आयपीएल सामना खेळवण्यात आला. या सामन्यात गुजरातने दिल्लीवर मात केली. यामध्ये एका गोलंदाजाने त्याच्या व्यावसायिक निष्ठेमुळे सर्वांचे लक्ष वेधले.

आयपीएल २०२५ स्थगित झाल्यानंतर आता ही स्पर्धा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. दिल्ली कॅपिटल्स संघासमोर एक मोठी अडचण निर्माण झाली होती. महत्त्वाचा गोलंदाज मिचेल स्टार्क परत येणार नसल्यामुळे दिल्लीसमोर गोलंदाजीचे मोठे आव्हान निर्माण झाले होते. त्यामुळे दिल्लीने तातडीने बांगलादेशी गोलंदाज मुस्तफिजूर रहमानला करारबद्ध केले.

करार झाला तेव्हा मुस्तफिजूर यूएईच्या दौऱ्यावर होता. तो तिथे बांगलादेशी संघाकडून खेळत होता. बांगलादेश व यूएईच्या संघात तिथे दोन टी-२० सामने खेळवण्यात आले. यापैकी शनिवारी खेळवण्यात आलेल्या सामन्यात मुस्तफिजूरने चार षटकांत १७ धावा देत दोन बळी मिळवले. हा सामना संपवून मुस्तफिजूरने भारताची वाट धरली. यूएईविरुद्धचा सामना संपताच तो दिल्लीच्या विमानात चढला. दोन हजार किलोमीटरचा प्रवास करून तो भारतात दाखल झाला. दुपारी तो दिल्लीची जर्सी परिधान करून दिल्लीच्या खेळाडूंबरोबर सराव करताना दिसला आणि रात्री अरुण जेटली स्डेटियमवर खेळायला उतरला.

## रामशेठ ठाकूर चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून नवीन पनवेल येथे साकारलेल्या दिलीप वेंगसरकर संचलित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्रात रामशेठ ठाकूर चषक १५ वर्षाखालील खेळाडूंची क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १९) झाले.

उद्घाटन समारंभास भारतीय संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर, उद्योजक राजू गुप्ते, भाजप पनवेल शहर मंडळ अध्यक्ष प्रशांत झुंझारराव, प्रशांत कर्पे आदी उपस्थित होते.



या स्पर्धेत एकूण १२ संघ सहभागी असून त्यांना चार गटांमध्ये विभागण्यात आले आहे. गट-अ मध्ये डीव्हीसीए पनवेल-अ, एजे स्पोर्ट्स क्रिकेट अकादमी व एबी इन्फ्रास्ट्रक्चर क्रिकेट क्लब उसर्ली हे संघ आहेत. गट-ब मध्ये वेंगसरकर क्रिकेट अकादमी माहुल, ड्रीम-११ वेंगसरकर क्रिकेट अकादमी आणि भेंडखळ क्रिकेट अकादमीचा समावेश आहे.

गट-सी मध्ये वर्रो वेंगसरकर क्रिकेट अकादमी (पुणे), करण कांबळे क्रिकेट अकादमी आणि खोपोली काइझेन जिमखाना हे संघ खेळणार आहेत, तर गट-डी मध्ये डीव्हीसीए पनवेल-बी, प्रतीक क्रिकेट अकादमी व फ्युचर स्टार क्रिकेट क्लिनिक या संघांचा समावेश आहे.

२९ मेपर्यंत खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेत विविध गटांचे सामने पार पडणार असून २७ मे रोजी दोन्ही उपांत्य सामने खेळवले जातील. २९ मे रोजी सकाळी ९.३० वाजता अंतिम सामना खेळवण्यात येणार आहे. ही स्पर्धा नवोदित खेळाडूंना आपले कौशल्य सादर करण्याची संधी देणारी ठरणार आहे.

## खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत आदित्य पिसाळचे सुयश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा २०२५मध्ये महाराष्ट्राच्या आदित्य पिसाळ या युवकाने उल्लेखनीय कामगिरी करीत दोन सुवर्णपदके जिंकली आहेत. तो वाशी येथील रहिवासी आहे.

आदित्यने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत १०.६२ सेकंदांचा वेळ नोंदवून नवीन स्पर्धा विक्रम प्रस्थापित केला. त्याने २०२२मध्ये सदानंद कुमारने केलेला १०.६३ सेकंदांचा विक्रम मोडला, तर महाराष्ट्राच्या ४X१०० मीटर रिले संघात आदित्यने तिसऱ्या टप्प्यात धावून संघाला सुवर्णपदक मिळवून दिले. संघाने ४१.५५ सेकंदांत ही स्पर्धा पूर्ण केली, जो एक नवीन स्पर्धा विक्रम आहे.



आदित्य हा बारावी सायन्समध्ये शिक्षण घेत असून फादर ॲग्नेल जिमखाना येथे श्रीनिवास गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत असतो.


















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com